**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०६३/२००७**

**१) श्री दिपक जगन्नाथ गुल्हाणे,**
**२०, नियोगी भवन, धंतोली,**
**नागपूर-४४०००१.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक**
**नागपूर वनविभाग, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी,**
**नागपूर वनविभाग, नागपूर, शासकिय मुद्रणालयाजवळ,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ०१.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा उप विभागीय वन अधिकारी यांना खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** :

"(१) श्री खोत, तत्कालीन अतिरिक्त मुख्य सचिव (वने) यांनी माहे मार्च, २००५ मध्ये उवसे नागपूर यांचेशी वनमजूरांच्या पत्रव्यवहारासंबंधी (२) उवस यांचे पत्र क्रं.२३१२ दि. २४.३.२००६ तसेच विदर्भ चंडीका यांना लिहिलेले पत्र मार्च, २००५ ते अद्यापपर्यंत.

मार्च, २००५ मध्ये श्री सोनकुसरे, उपसचिव (वने) यांना वनमजूरांबाबत माहिती गोळा करण्याकरिता पाठविण्याबाबत श्री मार्डीकर उवसे नागपूर यांना लिहीलेले पत्र व त्यासंबंधी श्री मार्डीकर यांचे प्रमुवसे म.रा. नागपूर यांनी दिलेली कारण दाखवा नोटीस व श्री मार्डीकर यांचे स्पष्टीकरण.

(२) विदर्भ चंडीका यांना लिहलेले पत्र क्रं.शिली-१/७६९१ दिनांक १०.३.२००६.

(३) उवसें यांचे पत्र क्रं.२३१२, दिनांक २४.३.२००६."

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २६.१०.२००६ रोजी छायांकित प्रती करीता लागणारा खर्च रुपये २०/- चा भरणा करुन माहिती घेवून जावी असे कळविण्यात आलेले दिसते. सदरच्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ९.११.२००६ रोजी माहिती उपलब्ध झाली होती. मुद्या क्रमांक १ मधील पत्राची प्रत उपलब्ध झाली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्यांनी दिनांक २९.११.२००६ रोजी पुन्हा माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी यांना विस्तृत असे घटनाक्रम देणारा अर्ज दिलेला दिसून येतो. व त्यानंतर दिनांक २७.४.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये मुद्या क्रमांक १ मध्ये नमूद केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. मुद्या क्रमांक २ बाबत पत्र क्रमांक २३१३, दिनांक २४.३.२००६ ची प्रत पुरविण्यात येत आहे, असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, संपुर्ण नस्तीचा शोध घेतला आहे व त्या त्या शाखेतील लिपिक किंवा अधिक्षकांनी मुद्या क्रमांक १ मध्ये उल्लेखित केलेले पत्र आढळून येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांना कळविलेले असल्यामुळे सदरच्या पत्राची प्रत उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्या पत्राच्या आधारेच श्री मार्डीकर यांच्याकडून स्पष्टीकरण घेण्यात आले होते व अपीलकर्ता यांचे त्याबाबत बयाण घेण्यात आले होते. परंतु, असे असले तरी वर नमूद केल्याप्रमाणे सदरचे पत्र उपलब्ध झालेले नाही व आवक नोंद वही सापडत नसून जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, आवक नोंद वही ही कार्यालयात आढळून येत नाही परंतु ती ज्या ठिकाणी संपुर्ण अभिलेख ठेवण्यात आलेला आहेत त्या ठिकाणी ती मिळू शकेल. व त्याचा शोध घेता येईल, असे त्यांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत अपीलकर्ता यांनी संबंधीत सर्व नस्त्यांचे निरीक्षण करुन सदरचे पत्र उपलब्ध असल्यास त्याची छायांकित प्रत त्यांना उपलब्ध करुन घेता येईल. तसेच श्रीमती बडकस व तत्कालीन डी.सी.एफ. यांना सुध्दा सदरचे पत्राचे संदर्भात विचारणा करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे दिनांक ३०.९.२००६ च्या अर्जामधील मुद्या क्रमांक १ मध्ये उल्लेखित केलेल्या पत्राचा शोध घेण्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत

संबंधीत नस्त्यांचे निरीक्षण करावे. सदरच्या निरीक्षणाकरीता कार्यालयीन वेळेत तारीख व वेळ ही जन माहिती अधिकारी यांना कळवावी.

२) अपीलकर्ता यांना कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ कळविल्यावर अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयाच्या कर्मचा-यांच्या उपस्थितीत सर्व संबंधीत दस्तऐवजाच्या नस्ती निरीक्षणास उपलब्ध करुन द्याव्यात. तसेच श्रीमती बडकस व तत्कालीन डी.सी.एफ. यांना सुध्दा सदरच्या पत्राच्या बध्दल विचारणा करण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ०१.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०६४/२००७**

**१) श्री शकील अहमद व. अब्दुल रशिद,**
**C/o मॉडर्न स्पोर्टस, मस्जीद जवळ,**
**लष्करीबाग, नागपूर-४४००१७.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**हुसामीया एज्युकेशन सोसायटी,**
**C/o जमाली इंग्लीश स्कुल शांतीनगर, नागपूर.**
**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
**जमाली इंग्लीश स्कुल, शांतीनगर, रतन टाटाजवळ,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ०१.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

१. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००६ रोजी शासकिय माहिति अधिकारी तथा हेडमिस्ट्रेस, जमाली इंग्लीश स्कुल, शांतीनगर, नागपूर यांचेकडे "(१) Salary statement w.e.f.१.७.८९ (२) Leave Account as per record w.e.f. १.७.८९ eo ९.११.२००६" अशी माहिती मागितलेली दिसून येते.

२. अपीलकर्ता यांच्या आयोगाकडील तक्रार क्रमांक ९२/२००७ मध्ये सुध्दा त्यांनी अशाच प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते व सदर तक्रार प्रकरणाचा निर्णय दिनांक २६.१२.२००७ रोजी देण्यात आलेला असल्यामुळे त्याच प्रकरणात एक वेळा निर्णय दिल्यानंतर पुन्हा निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**दिनांक :- ०१.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७४७/२००७**

**१) श्री सुनिल जेकब,**
**शिशु हाऊस, ६४०/B, खलाशी लेन,**
**नागपूर -४४०००१.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपनिगम आयुक्त-I**
**म.न.पा. सिव्हील लाईन, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिकारी,**
**झोन १०, मंगळवारी, महानगरपालिका, नागपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ०३.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे "दिनांक २४.११.२००६ खलाशी लाईन वार्ड ६५ मे. तोडे गये तीनों मकान किस आधिकारी या आयुक्त के आज्ञा से तोडे गये इतकी ऑर्डर कॅापी व अन्य समुपन आदि देणे.

(२) नोटीस क्रमांक ५३ व ५४ की ज्ञापन की माहिती की कागजात देणे.(सॅमसन अनिल प्लोरा ). सदरची माहिती व्यक्तीशः घेणार" असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने "नियमानुसार माहितीच्या अधिकारा अंतर्गत अर्जावर १० रुपयाचा कोर्ट स्टॅाम्प नाही. अनिल व प्लोरा यांचे नांव रेकार्डवर नाही. त्यामुळे माहिती देण्याचा प्रश्न उदभवत नाही. दिनांक २४.११.२००६ ला फक्त एकच झोपडे हटविण्यात आले होते. अर्जदाराने तीन झोपडयांविषयी विचारलेली माहिती चुकीची आहे. दिनांक १.१२.२००६ च्या अर्जात सॅमसन, अनिल, प्लोरा असे अस्पष्ट नांवे नमूद आहेत. तसेच दिनांक १७.६.२००८ च्या अर्जातही नांवा बाबत विसंगती आहे. अर्जात स्थळ वर्णन नव्हते. प्रश्न संदिग्ध होता. अर्जात नमूद व्यक्तीला कलम ५३ /५४ नोटीस देण्यात आला नव्हता. अर्जदाराने दिनांक १.१२.२००६ च्या अर्जात विचारलेली नांवे रेकार्डवर नाही." अशा प्रकारचा खुलासा आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसून येतो. व त्यामुळे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे दिनांक १५.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी अपीलीय अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २८.५.२००७ रोजी देण्यात आलेला असून दिनांक ९.३.२००७ चे टिपणी संदर्भात दिनांक ३१.१०.२००६ चे टिपणी जोडलेली असून कथीत अतिक्रमण काढण्यासाठी सहाय्यक आयुक्तांचे आदेश घेतलेले आहे हे स्पष्ट होते. तसेच दिनांक ९.३.२००७ चे टिपणी मध्ये मोक्यावर टेम्परररी सरकारी म.न.पा.च्या जागेवर अतिक्रमण केलेले असल्यामुळे नोटीस ५३/५४ देण्यात आलेली नव्हती अशा प्रकारे अपीलार्थीने विचारलेली माहिती देण्यात आलेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु सदरच्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, सदरच्या जागेवर अतिक्रमण असल्यामुळे त्याबाबतची नोटीस ५३/५४ प्रमाणे देण्यात आलेली नव्हती. परंतु कारवाई करतांना दिनांक ६.११.२००६, दिनांक २४.११.२००६ ला कारवाई करण्यात आली होती. व त्याबाबतच अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००६ रोजी झालेल्या कार्यवाहीबध्दल माहिती विचारलेली होती. परंतु दिनांक ९.३.२००७ च्या टिपणी मध्ये दिनांक ६.११.२००६ ची कार्यवाहीची माहिती आहे व त्यामुळे त्यांना दिनांक २४.११.२००६ च्या कार्यवाहीची माहिती मिळालेली नाही. तसेच अपीलकर्ता यांनी अर्जामध्ये जी नांवे दिलेली आहे त्याच्या मालकी हक्काच्या संदर्भात कागदपत्रे दाखल करण्याकरीता दिनांक ११.७.२००८ रोजी मुदत देण्यात आली होती. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी कागदपत्रे दाखल केली आहे. परंतु, सदरची संपुर्ण जागा ही नागपूर रोमन कॅथोलिक डायोरिन कार्पोरेशन (एनआरसीडीसी) यांची आहे असे दिसून येते. व त्यामध्ये अपीलकर्ता यांनी दिलेल्या व्यक्तीच्या, ज्यांना सदरच्या कार्पोरेशनने जागा/घरे दिली आहेत अशा व्यक्तींची माहिती जर मागीतली असेल तर महानगरपालिकेकडील तशा प्रकारची नोंद नसल्यामुळे ती देता येणार नाही, असे जन माहिती अधिकारी यांचे मत दिसून आले.

५. असे असले तरी सदरच्या प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप न करता अपीलकर्ता यांना दिनांक २४.११.२००६ झालेल्या कार्यवाहीची कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर

करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १.१२.२००६ च्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात दिनांक २४.११.२००६ रोजी जी कारवाई करण्यात आलेली आहे, त्या कारवाईच्या संदर्भामध्ये जे दस्तऐवज उपलब्ध असतील त्या दस्तऐवजाच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ५ दिवसांचे आंत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेकडे हजर होऊन सदरची माहिती विना मुल्य उपलब्ध करुन घेवून त्या प्रमाणे पोच देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ०३.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०६९/२००७**

**१) श्री रामसागर पुंडलिक पिलेवान,**
**८३, हिंदुस्थान कॅालनी, वर्धा रोड,**
**नागपूर ४४००१५.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक (गृह)**
**भंडारा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**पवनी, ता.पवनी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ०३.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर असून त्यांनी खुलासा व कागदपत्रे दाखल केली आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२००७ (२.६.२००६) रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा पोलीस स्टेशन ऑफिसर, पोलीस स्टेशन, पवनी यांचेकडे "मा. कोर्ट विद्यमान तहसिलदार व तालुका दंडाधिकारी तहसिल कार्यालय, पवनी यांना पोलीस स्टेशन अधिकारी, पवनी यांनी प्रतिवृत क्रमांक २७८/२००४ कलम १०७, ११६(३) जा.फौ.अन्वये गैर तक्रारदार श्रीमती प्रमिलाबाई भाऊराव गजभिये, दिनेश भाऊराव गजभिये, दिपकभाई भाईलाल भाई पटेल यांनी पोलीस स्टेशन, पवनी यांना सादर केलेल दस्तऐवत व त्यांचे लेखी बयाण, इतर सादर केलेले

कागदपत्रे व दस्तऐवजांच्या साक्षांकित प्रत पुरवावी," अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २८.६.२००७ रोजी महिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २१.७.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दिनांक ३०.७.२००७ अर्जात नमूद केलेली माहिती ही तहसिल कार्यालय, पवनी यांचेशी संबंधीत आहे कारण इस्तेगाता दाखल करताना इस्तेगाता सोबत संबंधीतांचे मुळ बयाण व संबंधीत कागदपत्रे जोडलेली असतात. त्यामुळे कृपया आपण अर्जात नमूद केलेले माहितीचे दस्तऐवज तहसिलदार पवनी यांना अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावे, असे कळविलेले दिसून येते. व सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक ७.८.२००७ ला प्राप्त झाले अशी नोंद दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना संपुर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. व त्यामुळे त्यांची कोणतीही तक्रार आता नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे निकाली करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ०३.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८१४/२००७**

**१) श्री भानुदास भिमराव पातोडे,**
**मु. तामशी, पो. बटवाडी, ता.बाळापूर,**
**जिल्हा अकोला.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाप्रबंधक**
**विदर्भ क्षेत्रिय ग्रामिण बँक, अकोला,**
**स्वानंद ओक मार्ग, जठारपेठ, अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**विदर्भ क्षेत्र ग्रामीण क्षेत्रिय बँक, अकोला,**
**शाखा बाळापूर, जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ०३.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२००७( ३.५.२००७ ला प्राप्त) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.८.२००८ रोजी सुनावणीच्या वेळेस उपस्थित राहू शकत नाही असा अर्ज दिलेला होता व त्यामुळे पुढील मुदत देण्यात येवून आज सुनावणी घेण्यात आली आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, ग्रामिण क्षेत्रिय बँक अकोला, शाखा बाळापूर यांचेकडे "लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व म. फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांना आपल्या शाखेतून केलेल्या कर्ज पुरवठया विषयी (कर्ज वाटप). माहितीचा कालावधी २००० ते २००६ पर्यंत.

(१) वरील महामंडळाच्या लाभार्थ्यांना कोणकोणत्या योजने द्वारे कर्ज देण्यात आले.

(२) कर्जाचे स्वरुप व त्यासाठी पुरविण्यात आलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती.

(३) व्यवसायासंबंधी सर्व कागदपत्रे सत्यप्रती.

(४) लाभार्थ्यांचे अनुदान बँकेत जमा झाल्याचे सत्यप्रती.

(५) बँकेचे महामंडळासोबत व लाभार्थ्यासोबत झालेल्या पत्रव्यवहारांच्या सत्यप्रती.

(६) सर्व माहिती गांवनिहाय, महामंडळनिहाय व व्यवसाय निहाय देण्यात यावी.

(७) सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित सत्यप्रती.

(८) लाभार्थ्याला कर्ज मंजूर केल्याच्या साक्षांकित सत्यप्रती.

(९) कर्जदाराने भरलेल्या कर्जाच्या (हप्त्याच्या) साक्षांकित सत्यप्रती.

(१०)सर्व माहिती गांवनिहाय देण्यात यावी."

अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे मागितलेली आहे. व दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले दिसून येते.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांना एकुण सर्व मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु, दिनांक ५.३.२००७ रोजी जन माहिती अधिका-यांनी दिलेला निर्णय हा योग्य ठरवून अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

४. द्वितीय अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी घेताना अपीलकर्ता यांच्या दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रांची छायांकित प्रतीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचे प्रमाणपत्र हे अपीलकर्ता हा प्रौढ असून सुध्दा पातोडे भिमराव ज्योतीराम यांच्या नांवाचे दिसून येते. अपीलकर्ता यांच्या स्वतःच्या नांवाचे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. आज पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा : "That, it is most respectfully submitted that the Appellant, Shri Bhanudas Patode, had sought information from the Respondent Bank vide two separate Applications. The Bank had, through its Public Information Officer, supplied the relevant information to him. However, the information, which was not possible to be passed over to the Appellant, was not supplied. For that purpose, it was also pointed out to the Appellant that the particular information was not supplied in view of Section ८(d) ( j ) of the Right to Information Act, २००५.

That, it is humbly submitted that the Appellant had sought all the documents pertaining to each and every loan transaction which took place between the Bank and its borrowers. Apart from the fact that such documents constituted a confidential and personal transaction between

the parties, these documents were voluminious in nature. It is submitted that on an average, each loan transaction consists of documents, running into about ૧૦૦ pages, with variety of documents. Therefore, it was not possible for the Bank to supply such voluminous documents pertaining to about ૫૭૦ transactions. Moreover, it would have caused lot of inconvenience to the Bank in providing Xerox copies of such a voluminous record to the Appellant.

That, further, the Appellant who being a third party, not connected with any of the loan transactions between the Bank and its borrowers, ought to have explained to the Bank as to why and under what circumstances he required Xerox copies of each and every loan transaction that took place between the Bank and its borrowers.

That, to the best of the knowledge of the Bank Officials, the Appellant claims to be a journalist in the local area and the Bank has reliably learnt that complaints have been registered against him by the local people, with the Govt. Authorities and the Police, of veiled threats, harassment etc. Hence, the Bank feels that the bonafides and the intention of the Appellant in seeking such voluminous record is also in doubt.

That, therefore, the Bank humbly submits that the Appeal itself is devoid of substance. It appears that the Appeal has been filed only to harass the Bank and its officers without any valid reason. Hence, the Appeal deserves to be dismissed summarily and by imposing exemplary costs on the Appellant for abuse of the process of law."

५. वरील खुलाशा वरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक स्वरुपाची असून मोघम आहे. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केल्यास बँकेची यंत्रणा स्वतंत्रपणे वळवावी लागेल. बँकेस खर्च सुध्दा येईल. सदरच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे व्यापक जन हित दिसून येत नाही. व तसेही, माहिती ही कर्जदारांची खाजगी माहिती असल्यामुळे अधिनियमाच्या कलम ८ (डी) व (जे) प्रमाणे सुध्दा सदरची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे जे जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे ते योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व उर्वरित माहितीच्या करीता जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ८ (डी) व (जे) प्रमाणे महिती उपलब्ध करुन देता येत नाही असे जे कारण दिलेले आहे ते योग्य असून अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ०३.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक ४८०/२००८**

**१) श्री वसंतराव नारायणराव कोटगिरवार,**
**रा. जवाहर कॅालनी, गुंजखेडा पो. पुलगांव,**
**ता.देवळी, जि. वर्धा. तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी सचिव,**
**ग्रामपंचायत कार्यालय, गुंजखेडा,**
**पो. सोरटा, ता. देवळी, जि. वर्धा. गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक ०४.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक १८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ (१) प्रमाणे तक्रार दाखल केली असून सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार हजर आहे. गैर तक्रारदार विना अनुमती गैरहजर आहे.

२. तक्रारदार यांच्या अपील क्रमांक १३५६/२००७ व १३५७/२००७ हे दिनांक ९.४.२००८ रोजी अंशतः मंजूर करण्यात आलेली असून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा कळविल्यानंतर व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच माहितीच्या पृष्ठांच्या खर्चाचे विवरण कळवून त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी माहितीच्या खर्च भरल्यानंतर त्यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत खर्चाचे विवरण कळविलेले नसल्याने त्यांच्या विरुध्द रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात आलेली असून सदरची शास्ती ही त्यांचे दर महिन्याचे वेतनातून वसुल करण्यात

यावी असे आदेश दिले होते. परंतु, तक्रारदार यांचे असे म्हणणे आहे की, गैर तक्रारदार यांनी आयोगाचे आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा खर्चाचे विवरण सुध्दा कळविलेले नाही. व त्यामुळे त्यांचेवर कलम २० प्रमाणे कार्यवाही व्हावी, अशी विनंती केली आहे. तक्रारदार यांचे असेही म्हणणे आहे की, तक्रारदार यांनी सिव्हील जज्ज, ज्युनिअर डिव्हीजन, पुलगांव कोर्ट क्रमांक १ (दिवाणी दावा क्रमांक १/२००४-एम.जे.सी.क्रमांक १/२००६) वसंतराव कोटगीरवार विरुध्द ग्रामपंचायत गुंजखेडा मार्फत सचिव+५, अशा प्रकारचे ग्राम पंचायत कराचे संदर्भात दावा दाखल केला आहे. व त्यामुळे तक्रारदार मकान कर भरत नाही वगैरे.. गैर तक्रारदाराचे आरोप हे सत्य नाही. तसेच अपील निर्णयातील जवाहर कॅालनीतील लोकांनी टॅक्स देऊ नये अशा प्रकारचे जन माहिती अधिका-यांचे आरोप निराधार आहे व त्याकरीता सहपत्र क्रमांक ४,५ व ५/१ मध्ये जवाहर कॅालनीतील नागरिकांनी एकुण ४९ सहयांच्या अर्जाद्वारे न्याय मागणी करीता आवश्यक दस्ताऐवजाची मागणी केलेली आहे, असे दिसून येते. व त्यामुळे तक्रारदार फक्त तक्रार करतात असे नाही. परंतु तक्रारीत अर्जदार यांस खर्चाचे विवरण कळविले नाही. अशी तक्रार अर्जात केली नाही.

३. असे असले तरी गैर तक्रारदार यांनी आयोगाच्या आदेशाचे पालन केलेले नाही व तक्रारदार स्वतः जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात गेले असता माहिती तर उपलब्ध करुन दिलेली नाहीच परंतु ते बोलायलाही तयार नसतात असे तक्रारदार यांनी आयोगापुढे तोंडी सांगितले.

४. आज सदरच्या तक्रारीची सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. त्याकरीता दिनांक ८.९.२००८ रोजी आयोगाचे कार्यालयातून नोटीस काढण्यात आलेली आहे. सदरची नोटीस ही

तक्रारदार यांना मिळते. यावरुन ती गैर तक्रारदार यांना सुध्दा मिळाली असावी असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. तरी सुध्दा गैर तक्रारदार हे गैरहजर आहेत व कोणत्याही प्रकारचे कागदपत्र किंवा खुलासा त्यांनी आतापर्यंत सादर केलेला नाही. व त्यावरुन तक्रारदार यांना, त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही किंवा खर्चाचे विवरण कळविलेले नाही, असाही निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे गैरतक्रारदार हे शास्तीस पात्र आहे. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून गैर तक्रारदार यांनी १० दिवसांचे आंत खर्चाचे विवरण कळवावे व माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) तक्रारदार यांनी अपील क्रमांक १३५६/००७ व १३५७/२००७ मधील दिनांक ९.४.२००८ च्या आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना खर्चाचे विवरण कळविले नसल्यामुळे व त्याप्रमाणे १० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे दोषी आढळून येतात व अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे त्यांचे विरुध्द रुपये २५,०००/-(रुपये पंचवीस हजार फक्त) शास्ती लादण्यात येत असून ती त्यांच्या दर महाच्या वेतनातून वसुल करण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची प्रत ही गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी, जि. वर्धा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देवळी यांनी सदरच्या निर्णयातील आदेशाप्रमाणे कार्यवाही करुन आयोगाकडे तसा अहवाल ३० दिवसांचे आंत सादर करावा.

५) निर्णयाची एक प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना देण्यात यावी.

वरीलप्रमाणे निर्णय झाल्यानंतर ५ मिनिटातच गैरतक्रारदार हे हजर झाले आहे. नागपूर येथील आयोगाचे कार्यालय शोधण्यास वेळ लागल्यामुळे आयोगाचे कार्यालयात पोहचण्यास

उशिर झाला असे गैर तक्रारदार यांनी सांगितले. तक्रारदार यांचा पुकारा केला परंतु तोपर्यंत तक्रारदार हे निघून गेलेले होते असे सांगण्यांत आले. तक्रारदार यांनी आयोगापुढे त्यांची दिवाणी न्यायालयात केस सुरु आहे, याचा उल्लेख केलेला आहे. परंतु गैरतक्रारदार यांनी असे सांगितले की, सदरची केस ही खारीज करण्यात आलेली आहे. ग्राम पंचायत अधिनियमाप्रमाणे मालमत्ता कराची तक्रार/अपील ही पंचायत समिती/जिल्हा परिषद यांचेकडे दाखल करावयाची असते. तक्रारदार यांचेकडे रुपये ५२,०००/- ची थकबाकी असल्यामुळे ते वारंवार माहितीच्या अधिकारात अनेक अर्ज करतात.

आयोगाचे अपील क्रमांक १३५६/२००७ व १३५७/२००७ च्या दिनांक ७.५.२००८ चा निर्णय दिनांक २९.५.२००८ ला प्राप्त झाल्यावर तक्रारदार तथा अपीलकर्ता यांना दिनांक ७.६.२००८ रोजी ग्राम पंचायत कार्यालय, गुंजखेडा यांचे जावक क्रमांक १७७, प्रमाणे सत्यप्रतिलीपी बाबत शासन निर्णयाप्रमाणे रुपये १३००/- भरणा करण्यात यावा व रितशीर पावती घेवून जावी व नंतरच आपण माहिती व्यक्तीशः घेवून जावी असे पत्राने कळविलेले दिसून येते. पत्राची प्रत सादर केली आहे. गैरतक्रारदार यांनी त्याकरीता पोस्टाचा पुरावा जोडलेला दिसून येतो. पावती रजिस्टर पोस्टाची रुपये २५/- दाखल केली आहे. त्यात दिनांक ७.६.२००८ रोजी अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने पत्र पाठविल्याचा पुरावा जोडलेला आहे. व त्यावरुन अपीलकर्ता यांना विहित मुदतीत खर्चाचा भरणा करावा असे कळविले असल्यावर सुध्दा अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केलेला नाही, असे आयोगापुढे सांगितले यावरुन तक्रारदार यांनी आयोगाची दिशाभूल केली असाच अर्थ होतो. व त्यामुळे वरील निर्णय रद्द करण्यात येत

असून तक्रारदार यांची तक्रार ही रद्द करण्यास पात्र आहे. व तक्रारदार यांना गैरतक्रारदार यांनी दिनांक ७.६.२००८ रोजी कळविल्याप्रमाणे खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

**आदेश**

१) तक्रारदार यांनी आयोगाची दिवाणी दाव्याबाबत व खर्चाचे विवरण पाठविले नाही अशा कारणास्तव आयोगाची दिशाभूल केलेली असल्याने त्यांची तक्रार ही गैरतक्रारदार यांच्या दाखल केलेल्या पुराव्याप्रमाणे रद्द करण्यात येत असून तक्रारदार यांनी खर्चाचा भरणा केल्यानंतरच त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ०४.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक ४७७/२००७**

**१) श्री दिनकर किसन नाफडे,**
**मु.पो. दसरखेड, ता. मलकापूर, जि. बुलढाणा.** **तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**श्रीराम विद्यालय कौलखेडा, खेतानगर,**
**ता.जि. अकोला.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक ०४.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक १६.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

तक्रारदार यांची आयोगाकडील अपील क्रमांक १८२५/२००७ मध्ये दिनांक ३०.७.२००८ रोजी निर्णय दिलेला असून निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांना माहिती देण्यात आलेली असल्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

**दिनांक :- ०४.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १८६२/२००७**

**१) श्री विश्वनाथ गंगाराम उगले,**
**मु.पो. शिर्ला (अंधारे)**
**ता. पातूर , जिल्हा अकोला.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, पातूर, जिल्हा अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत,**
**कार्यालय शिर्ला, ता. पातूर, जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ०६.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२००७ (प्राप्त ८.५.२००७) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी विना अनुमती गैरहजर आहेत.

२. सदरच्या अपीलाची सुनावणी सुरुवातीला २४.६.२००८ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळेस गट विकास अधिकारी व सविच तथा जन माहिती अधिकारी हे हजर होते. परंतु, कागदपत्रे दाखल केलेली नव्हती. दिनांक ७.८.२००८ रोजी कागदपत्र दाखल करावयाचे होते. परंतु, उत्तरवादी हे आयोगाचे कार्यालयात उशिरा संध्याकाळी उपस्थित झाले. त्यामुळे पुन्हा आज सुनावणीस तारीख देण्यात आली असे दिसून येते. परंतु आजही उत्तरवादी उपस्थित नाहीत.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००७ (३.३.२००७) रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, शिर्ला यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** :

"(१) खंडू चिदाजी वसतकार घर क्रं. २०२ (२) खंडू चिदाजी वसतकार घर क्रं. ६ (३) संजय खंडूजी वसतकार घर क्रं. १७ (४) दिनकर चिंदाजी वसतकार घर क्रं. ७ (५) काशिनाथ चिंदाजी वसतकार घर क्रं. ८ वरील ग्राम पंचायत शिर्ला (अंधारे) येथील घराच्या जागेच्या नोंदी ग्राम पंचायत नमूना आठ ८ ला नोंदीसाठी आवश्यक असलेल्या कोणत्या कागदपत्राच्या आधारे घेण्यात आल्या व कोणत्या मासिक सभेसमोर ठेवण्यात येवून चर्चे अंती मंजूरात घेण्यात येवून घेण्यात आल्या तसेच कोणत्या ठरावावी कोणत्या कागदपत्रांचे आधारे त्या ठरावाचे व कागदपत्राचे नक्कल देण्यात याव्यात. वरील लोकाचे जानेवारी १९६९ ते २००७ पर्यंत वर्षनिहाय नमूना ८ (आठ) देण्यात यावे."

४. सदरच्या माहितीचा कालावधी ३८ वर्षापूर्वीचा असून माहिती व्यक्तीशः स्वतः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जामध्ये माहितीचा खर्च भरणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००७ (५.४.२००७) रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २४.४.२००७ रोजी गट विकास अधिकारी यांनी सचिव यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्र देवून माहिती तयार करुन या कार्यालयास त्वरीत पाठवावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना देण्यात आलेली

दिसून येते. परंतु सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.६.२००८ रोजी प्रतिज्ञापत्र सादर केले आहे व सदरच्या प्रतिज्ञा पत्रामध्ये त्यांना "माहिती उपलब्ध झालेली नाही. मात्र माझ्याकडे जे दस्तऐवज उपलब्ध आहेत त्याबाबत मी जागेबध्दल क्षेत्रफळात बदल केला आहे, ते चुकीचे आहे, ते मी सिध्द करु शकतो. यापुढे पत्रव्यवहार माझे वैयक्तिक पत्यावर करावा. अंडर पोस्टींग करु नये. गहाळ होण्याची शक्यता आहे. रजिस्टर पोस्टाने पत्रव्यवहार करावा जेणेकरुन माझी त्यावर स्वाक्षरी राहील. नियमानुसार कार्यवाही करावी. तसेच द्वितीय अपीलार्थी यांनी एक वर्षानंतर माहितीसाठी प्रत्यक्षात पाठविलेले आहे. यामुळे माहितीच्या अधिकाराबाबत विश्वास उडत आहे," असे नमूद केलेले आहे. यावरुन असे दिसून येते की, श्री उगले यांनी अर्ज केल्याबरोबर त्यांच्या अर्जावर सर्वात प्रथम निर्णय व्हावा, असे दिसून येते.

६. सदरच्या अपीलाच्या संदर्भात सचिव, ग्राम पंचायत, शिर्ला यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केला आहे. त्यामध्ये "ग्राम पंचायत शिर्ला जवळ जेवढी माहिती उपलब्ध आहे, ती माहिती अपीलकर्ता यांना ग्राम पंचायत कार्यालय, शिर्ला येथे प्रत्यक्ष दाखविली व लेखी देण्यासाठी पत्र सुध्दा तयार केले. अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष नियम ८ चे रजिस्टर दाखविले असता सदर नियम ८ चे रजिस्टरवर क्षेत्रफळाचे रकान्यामध्ये, क्षेत्रफळाची दुरुस्ती करुन देण्याचा आग्रह केला. सदर नियम ८ च्या रजिस्टर प्रमाणे अपीलकर्ता यांना सत्यप्रती दिलेल्या आहेत," असा खुलासा सादर केला आहे. व त्याकरीता दिनांक ३०.३.२००७ चे पत्र सादर केले आहे. सदरचे पत्र हे सचिव, ग्राम पंचायत शिर्ला यांनी अपीलकर्ता यांना संबोधित केलेले असून

आपला वरील संदर्भिय अर्ज ग्राम पंचायतकडे प्राप्त झाला असून त्या अर्जानुसार मागणी केलेली माहिती नमुना ८ चे रजिस्टरची नक्कल सन १९६९ ते २००७ पर्यंतची माहिती ग्राम पंचायत शिर्ला जवळ जी माहिती उपलब्ध आहे, ती आपणास या पत्राद्वारे सादर करीत आहे. सहपत्र नमूना-८ ची झेरॉक्स सत्प्रत सन १९७७-७८, सन १९८०-८१, सन १९८१-८२, सन १९९०-९१, सन १९९४-९५ ते १९९९-२०००, सन २०००-२००१, सन २००१-२००२ एकुण पाने ७. त्यावर वरील माहिती ग्राम कर्मचारी माहिती घेवून गेले असता जागेचे क्षेत्रफळामध्ये दुरुस्ती करुन मला माहिती द्या, असे श्री उगले म्हणाले, असे श्री खरडे यांचा शेरा नमूद केलेला दिसून येतो. तसेच पुन्हा दिनांक १९.४.२००७ रोजी ग्राम पंचायत शिर्ला यांनी अपीलकर्ता यांना माहिती घेवून जाण्याकरीता संबोधित केलेले पत्र आहे. त्यावर वरीलप्रमाणे माहिती घेवून श्री उगले यांचेकडे गेलो असता, मला जागेचे क्षेत्रफळामध्ये दुरुस्ती करुनच मला माहिती द्यावी, असे ग्राम पंचायत कर्मचारी श्री खरडे यांचा शेरा असून श्री गणेश बबन गवई या ग्राम पंचायत सदस्या समक्ष, असा शेरा नमूद केलेला दिसून येतो.

७. आज अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचेकडे नियम ८ च्या प्रती आहेत, त्यावरील नोंदीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्या कशाच्या आधारावर केल्या गेल्या याची माहिती त्यांना उपलब्ध झालेली नाही व त्यांनी क्षेत्रफळ दुरुस्ती करुन द्यावी, अशी मागणी केलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणत्याही प्रकारची कार्यवाही ही करुन मिळत नाही. माहिती जशी असेल, ज्या स्वरुपात उपलब्ध असेल, त्या स्वरुपात छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. अर्थात अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे जर क्षेत्रफळ चुकीचे असेल तर ते कोणत्या आधारे केलेले आहे, त्याबाबत

कागदपत्रे उपलब्ध असल्यास त्याची छायांकित प्रत त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील.

८. तसेच जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत शिर्ला हे आज सुनावणीस हजर नसल्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे व त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २०.२.२००७(३.३.२००७) च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी माहिती स्वतः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा सचिव यांचे कार्यालयात जावून जन माहिती अधिकारी यांचेकडून हा निर्णय मिळाल्यापासून १२ दिवसांचे नंतर व १५ दिवसांचे आंत सदरची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य उपलब्ध करुन घ्यावी.

३) जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत शिर्ला हे आयोगापुढे सुनावणीस हजर न राहील्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे. अशी कार्यवाही ही गट विकास अधिकारी यांनी करावयाची असून त्याबाबतचा अहवाल तीन महिन्यांत आयोगास सादर करावयाचा आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ०६.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक २४/२००८**

**१) ॲड. श्री कौस्तुभ उत्तमराव फुले,**
**रा.डॉ. फुले स्मृती निवास,**
**बुध्द नगर युनिट नं.२, नागपूर-१७.** **तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकिय अधिकारी,**
**शासकिय वैद्यकिय महाविद्यालय (मेडिकल),**
**नागपूर.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक ०७.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक १६.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार विना अनुमती गैरहजर आहेत. गैरतक्रारदार तथा जन माहिती अधिकारी हजर आहे.

१. तक्रारदार यांनी दिनांक ३०.८.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मगितलेली दिसून येते.

**हवी असलेली माहिती** :

१) एनाफायलेक्टिक रिॲक्शन म्हणजे काय?

२) abdominal pain च्या निदाना करिता पोटाचा सिटिस्कॅन करतेवेळी Contrast Media चे इंजेक्शन देणे आवश्यक आहे काय?

३) Contrast Media चे इंजेक्शन हे अस्थमा व हार्ट डिसीजच्या पेशंटला देण्यास ॲडव्हाईजेबल आहे काय?

४) Contrast Media मुळे होणा-या एनाफायलेक्टिक रिॲक्शनला रोकण्यासाठी कोणकोणते प्रतिबंधक उपाय (Preventive or Safety Measures) आहेत?

५) "Extradural Haemorrage seen all ever the brain Tissue" याचा एकंदरीत अर्थ काय? असे कशामुळे घडते?

६) Contrast Media चे इंजेक्शन देणे केव्हा केव्हा आवश्यक असते? तसेच Contrast Media चे इंजेक्शन हे केव्हा केव्हा व कोणकोणत्या परिस्थितीत देण्याचे टाळजे पाहिजे?

७) I) Contrast Media, their Reactions, Radiation Hazard and their Prevention.

II) Diagnostic Imaging by Peter Armstrong and Martin L. Whasti.

III) Radiology and Imaging by Devid Suffon.

IV) Medical Literature of Contrast Media Injection Omnipaque.

V) Text Book of Radiology for residents and Technicians by Prof. Satish Kumar Bhargava.

वरील पुस्तकांमध्ये खालीलप्रमाणे Preventive Measures नमूद आहेत. :- "The contrast medium injection, should be avoided in elderly patients over ५० yrs.of age or those with history of heart desease and bronchial Asthama. These patients are particularly susceptible and they should be

premedicated with glucocorticoids/steroids preferably for at least १८ hours prior to the examination. Antihistamine drugs may also be given shortly before the contrast injection. Diazepam should be used to sedate the patient as it quietens the CNS and minimizes its ability to react. पुस्तकांत नमुद केलेले हे म्हणणे बरोबर आहे काय? जर खरे असेल तर वरील प्रकारचे कोणतेही Preventive Measures न घेता Asthama व Ischaemic heart disease ची हिस्ट्री असलेल्या पेशन्टला सरळ Contrast Media चे इंट्राव्हेनस इंजेक्शन टोचल्याने Anaphylatic reaction होऊन पेशन्ट दगावतो. तेव्हा त्या ठिकाणी निष्काळजीपणा घडला असे म्हणता येईल काय?

वरील माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये त्वरीत पुरविण्यात यावी, ही विनंती. "

२. सदरची माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये मोडत नसल्याने संदर्भीय अर्जात नमूद माहिती पुरविणे आवश्यक नाही असे, माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकिय अधिकारी, शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपूर यांनी दिनांक ४.९.२००७ रोजी तक्रारदार यांना कळविले दिसून येते. परंतु, तक्रारदार यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक १०.१.२००७ रोजी अपीलीय अधिकारी तथा प्रा.व विभाग प्रमुख, न्यायवैद्यकशास्त्र विभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.१०.२००७ रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला दिसून येतो. व त्यामुळे तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

३. राज्य माहिती आयोगाकडून प्रथम अपीलीय अधिकारी यांना प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला नसल्यामुळे खुलासा विचारण्यात आला होता. त्याप्रमाणे दिनांक १७.१२.२००७ रोजी खुलासा करण्यात आलेला असून सदरच्या खुलाशाप्रमाणे तक्रारदार यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे ही त्यांनी उल्लेख केलेल्या पुस्तकामध्येच असल्यामुळे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे मागितलेली माहिती ही नसल्यामुळे सदरच्या अपीलाच्या संदर्भात त्याप्रमाणे दिनांक ३.१०.२००७ रोजी कळविण्यात आलेले होते, असा खुलासा केलेला आहे.

४. तक्रारदार यांच्या वर नमूद केल्याप्रमाणे मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(च) मधील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येमध्ये तक्रारदार यांनी मागितलेली माहिती ही येत नसल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. त्यामुळे तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ०७.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०७२/२००७**

**१) श्री प्रतापसिंह सुरजसिंह रस्से**
**C/o अमित टेलीकॅाम, जयदिप मेडीकलचे समोर,**
**गंजवार्ड नं.२, पो.ता.जि. चंद्रपूर -४४२४०२.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्ष,**
**भूमी अभिलेख कार्यालय, चंद्रपूर**
**नवीन प्रशासकिय इमारत, एस.टी.स्टँाडसमोर, चंद्रपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,**
**चंद्रपूर, दुध डेअरी जवळ, ता.जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ०८.१०.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : "भानापेठ शिट नं. १५ ब्लॅाक नं. ४० प्लॅाट नं. ४ (१९५५-५६) प्लॅाट नं. ४/२ (१९६२) आराजी १५३० चौ.फुट महसुल प्रकरण ३००/७-२, ५५-५६ नुसार दि. ४.८.१९५६ ला सार्वजनिक लिलावाद्वारे खरेदी केलेली मालमत्ता सुरजसींह रामचंद्र रस्से (अहीर) चे नांवे होती. १९६२ ते १९९२ पर्यंत लिज भरण्यात आली, परंतु १९७७-७८ मध्ये सुरजसींह रामचंद्र रस्से चे नांवे लिज खारीज करुन महसुल प्रकरण ५३३, २२,१९८२-८३

प्रमाणे वसंत रामचंद्र रस्से चे नांव चढविण्यात आले ते कोणत्या दस्तऐवजाचे आधारे चढविण्यात आले, त्याची माहिती महसुल प्रकरण ५३३/LNA-२२/१९८२-८३ लिज नुतनीकरण १९८२ ते २०१२. (१) सौ. किरणदेवी छगणसिंह यादव (२) सौ. तुळसाबाई सुधाकरसींह गौर चे नांवे १९९५-९६ ला कोणत्या दस्तऐजाप्रमाणे चढली." सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.६.२००७ रोजी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी मागितलेली माहिती संदिग्ध असल्यामुळे कार्यालयात येवून कोणती माहिती पाहिजे हे कळवावे, असे उत्तर दिले. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक १३.६.२००७ रोजी पुन्हा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना माहितीचे विवरण कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे पुन्हा दिनांक १५.६.२००७ रोजी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांनी रामाक्रं.३४/RTS/६४/८४-८५, तहसिल चंद्रपूर दि. १७.१.८५ अन्वये नांवाची दुरुस्ती झाल्याचे दिसून येते, असे कळविलेले दिसून येते. तसेच नायब तहसिलदार, चंद्रपूर यांचेकडून नमूद केलेल्या प्रकरणाचा शोध घेवून त्यांच्याकडून आवश्यक कागदपत्रे प्राप्त करुन घ्यावी, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २०.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दिनांक २२.६.२००६ रोजी पुन्हा सदरच्या प्रकरणाच्या संदर्भामध्ये, सदरची बाब ही भुमी अभिलेख खात्याशी संबंधीत नसून महसुल विभागाशी संबंधीत आहे. तरी त्यांच्याकडून मुळ प्रकरणाचा शोध घेवून आवश्यक माहिती प्राप्त करुन घ्यावी ही विनंती, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दिनांक २.७.२००७ रोजी शिट क्रं. ४० प्लॉट ३६३७ ची आखीव पत्रिका श्रीमती किरणदेवी छगनसिंह यादव, सुधाकर सिंह गौर, इत्यादिंच्या नांवे आहे, असे कळवून सुरजसिंह

रामचंद्रसिंह रस्से यांचेकडून सदर मिळकत दिनांक २२.११.७९ ला खरेदी केली. परंतु सुरजसिंह रस्से यांचे नांवाने अभिलेख नसल्याने फेरफार करता येत नाही, असे कळविले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना या संदर्भात माहिती उपलब्ध झालेली नाही असे दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे सुध्दा अर्ज केलेला दिसून येतो. परंतु, पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयाने तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, चंद्रपूर यांचेकडे अपीलकर्ता यांचा दिनांक १५.११.२००७ चा अर्ज पाठविलेला दिसून येतो. वास्तविक, खसरा वरुन असे दिसून येते की, १९८४-८५ मध्ये सुरजसिंह यांनी ७६५ चौरस फुट जागा ४,०००/- रुपयास मायादेवी वि. वसंतराव, सौ. किरण, अशोक, प्रदीप, मोहन, सुरेश, प्रल्हाद, दिलीप पिते वसंतराव हयांचे कडून दिनांक २६.११.७९ ला रजि.विक्रीपत्र करुन घेतले रा.फ.क्रं.१३४/R.T.e/६४/८४-८५, तहसिल चंद्रपूर यांचे आदेश दिनांक १७.१.८५ अन्वये नांव दर्ज केले अशी नोंद दिसून येते व त्यामुळे या नोंदीच्या नंतर श्री सुरजसिंह रामचंद्र रस्ते यांचेकडून कोणत्या प्रकारे हस्तांतरण झाले याबध्दलची माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक दिसून येते. व त्याप्रमाणे त्या संदर्भातील सर्व खस-यांच्या प्रती किंवा फेर फारच्या प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात मागितलेल्या माहितीप्रमाणे सौ. किरणदेवी छगणसिंह यादव, सौ. तुळसाबाई सुधाकरसिंह गौर ची नांवे १९९५-९६ ला कोणत्या दस्तऐवजा प्रमाणे लावण्यात आली याबध्दलची फेरफारची कागदपत्रे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन

देण्यात यावी. तसेच श्री सुरजसिंह रामचंद्र रस्से यांचे नांव कोणत्या आधारे कमी झाले याबध्दल सुध्दा असलेली कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांनी व्यक्त्तीशः हा निर्णय मिळाल्यापासून जन माहिती अधिकारी यांचेकडे कार्यालयात १० दिवसांचे आंत प्रत्यक्ष संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

३) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ०८.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०७५/२००७**

**१) श्री भिमराव राजन्ना जंमपलवार,**
**रा.केळझर, पो. विरुर, ग्रा.पं. डोंगरगांव,**
**जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**डी.एफ.ओ. वन विभाग (मध्य चांदा)**
**चंद्रपूर, ता. जिल्हा चंद्रपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्राधिकारी,**
**वन विभाग विरुर, ता. राजूरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ०८.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००७ रोजी (प्राप्त दिनांक १०.४.२००७) शासकिय माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी यांचेकडे दिनांक ४.११.२००६ ला डुकरांनी केलेल्या नुकसानीबाबत अर्ज व ७/१२, टोच नकाशा मागितला, त्याप्रमाणे अजूनपर्यंत मोबदला मिळाला नाही, अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही, म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२००७ रोजी प्रथम अपील केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने व अपीलाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना नुकसान भरपाईच्या संदर्भामध्ये दिनांक १४.६.२००७ रोजी प्रकरण तयार झाल्यानंतर त्यामध्ये काही तांत्रिक उणिवा असल्यामुळे प्रकरण वन परिक्षेत्र अधिकारी, विरुर यांचे स्तरावर त्रुटींच्या पुर्ततेसाठी प्रलंबित आहे. प्रकरणातील त्रुटींची पुर्तता त्वरीत करुन सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. नुकसान भरपाईचे

प्रकरण या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्वरीत निकाली काढण्याची तजविज घेण्यात येईल, असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक ४.८.२००७ रोजी उप वनसंरक्षक यांनी नुकसान भरपाईचा आदेश काढलेला असून शासनाकडून अनुदान उपलब्ध होताच आपणास नुकसान भरपाईची रक्क्म त्वरीत वितरित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दिनांक ६.१२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना रुपये १५००/- नुकसान भरपाई उपलब्ध करुन दिलेली असून ती अपीलकर्ता यांना मिळाल्याची त्यांच्या हस्ताक्षरातील नोंद दिसून येते. व त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांनी माहिती मागितलेली नसून सुध्दा नुकसान भरपाईचा मोबदला हा उपलब्ध करुन दिलेला आहे.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना २००७ मधील नुकसान भरपाई मिळालेली नाही. परंतु अपीलकर्ता यांनी २००७ मधील अर्जातच दिनांक ४.११.२००६ च्या घटनेचा उल्लेख केलेला आहे. त्यांना पुन्हा नुकसान झाले आहे काय असे विचारले असता त्याबध्दल त्यांनी काहीही सांगितले नाही व त्यामुळे त्यांच्या दिनांक ७.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ०८.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २०७६/२००७**

**१) श्री होमराज केशवराव खुसरे, सचिव**
**ओमसाईनाथ बाबा ग्रामीण विकास शिक्षण विद्या प्रसारक मंडळ,**
**वाकी ता. सावनेर, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी**
**माध्यमिक विभाग, जिल्हा परिषद, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**शिक्षण विभाग, माध्यमिक, जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ०८.१०.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.९.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी तथा माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १७.४.२००७ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : "(१) ओम साईनाथ बाबा ग्रामीण विकास शिक्षण विद्या प्रसारक मंडळ वाकी, ता. सावनेर जि. नागपूर या संस्थेला २००० ते २००२ मध्ये नाकारण्यात आलेल्या परवानगी बाबत माहिती. (२) यशवंत बाबा संस्था बिचवा या संस्थेला २००२ मध्ये देण्यात आलेल्या परवानगीबाबत ची माहिती.

अर्जदाराने ओम साईनाथ बाबा ग्रा.वि.शिक्षण वि. प्रसारक मंडळ वाकी येथे माध्यमिक शाळा चालु करण्याबाबत दि. ४.४.२००० अर्ज दिलेला होता. त्या बाबत कोणताही निर्णय न कळविता अर्जदाराच्या संस्थे नंतर गैरस्थानिक असलेल्या यशवंत बाबा संस्था बिचवा या संस्थेने २००१ मध्ये दाखल केलेल्या अर्ज नुसार वाकी येथे माध्यमिक शाळा सुरु करण्याकरीता दि. ३.९.२००२ रोजी परवानगी दिली. त्यामुळे अर्जदाराचे संस्थेवर अन्याय झाल्याने व यशवंत बाबा संस्थेला खोटया माहितीच्या आधारे परवानगी देण्यात आल्याचे लक्षात आले म्हणून मला खालील माहिती आवश्यक आहे.

(१) ओमच्या संस्थेचा वाकी या गावाकरीता दि.१०.४.२००० अर्ज केव्हा निकाली काढण्यात आला त्या आदेशाची प्रत संबंधीत माहिती.

(२) वरील संस्थे बाबतच्या प्रस्तावावर जिल्हा व राज्यस्तरीय समित्यांनी सादर केलेल्या शिफारशिच्या प्रती.

(३) यशवंत बाबा संस्था बिचवा यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत त्यांच्या प्रस्तावास जिल्हा व राज्यस्तरीय समित्यांनी दिलेल्या शिफारशिच्या प्रती व प्रस्तावावर मंजूरीच्या आदेशाची प्रत. तसेच त्यांनी सादर केलेल्या इमारतीच्या नकाशाची प्रत.

(४) वाकी येथील अर्जदाराच्या संस्थेला डावलून ३५ ते ४० किलोमिटर दुर असलेल्या बिचवा येथील संस्थेस परवानगी कोणत्या आधारावर, शासकिय, परिपत्रक व नियमानुसार देण्यात आली. त्या सर्व कागज पत्राच्या प्रती माहिती देण्यात यावी."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००७ रोजी कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्यामुळे आपणास उपलब्ध करुन देता येणार नाही, असे कळविलेले दिसून

येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे दिनांक ८.८.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २४.८.२००७ रोजी घेण्यात आली असून सुनावणीत अपीलकर्ता यांना कार्यालयातील सर्व अभिलेख दाखवून आवश्यक असलेली मुद्या क्रमांक १ ते ४ ची माहिती उपलब्ध करुन दिली, तशी नस्तीवर स्वाक्षरी दिसून येते. नोटशिट वरुन (१) जि.शि./मा ४१६९/०७ का.जि.प.नागपूर शि.वि.मा.दि.२.८.२००७ चे पत्र प्राप्त झाले. (२) नवीन शाळा सुरु करण्यासाठी प्रस्ताव पाठवा दिनांक ३०/१२ (३) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्रं. १००२/५९१/२००२/यादी-१ शिबिर कार्यालय, हैद्राबाद हाऊस, नागपूर दिनांक १७.१२.२००२. (४) सन २००३-०४ साठी शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावात नवीन मध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांची फेर तपासणीचे पत्र प्राप्त झाले. वरील १ ते ४ चे कागद पत्र मला प्राप्त झाले आहे.

४. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचे सुनावणी मध्येच सदरच्या कागदपत्रांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांचे असे म्हणणे अहे की, त्यांच्याकडेच सदरचे कागदपत्र उपलब्ध असावयास पाहिजे. त्यावर शिक्षणाधिकारी यांनी असे सांगितले की, शाळा उभारण्यासाठीचे प्रस्ताव आल्यानंतर सर्व प्रस्ताव हे संचालनालयाकडे व शासनाकडे पाठविले जातात. त्यातील कोणत्याही प्रकारची माहिती ही शिक्षणाधिकारी कार्यालयात पाठविली जात नाही. मात्र, मान्यता मिळाल्यानंतर त्याबाबतची यादी शासनाकडून येते. पुणे येथील संचालनालयाकडून सुध्दा कागदपत्रे नष्ट करण्याच्या संदर्भात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचा शेवट पर्यंत आग्रह हा त्यांच्याकडे माहिती उपलब्ध असते असाच आहे. मात्र, त्याकरीता कोणत्याही प्रकारचा

पुरावा हा अपीलकर्ता यांचेजवळ नाही. त्याबाबत अपीलकर्ता यांना माहिती आवश्यक असल्यामुळे त्यांनी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयातील संबंधीत विषयाच्या आवक नोंदवहीतून प्रस्ताव छाननी करुन त्याप्रमाणे अभिलेख्यात संबंधीत अभिलेखे आहेत किंवा नाही याची तपासणी करणे संयुक्तिक राहील. व सदरची तपासणी कार्यालयाचे अधिकृत कर्मचारी यांचे उपस्थितीत करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आदेश</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १७.४.२००७ च्या अर्जाप्रमाणे महितीचा शोध घेण्याकरीता शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तथा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील जावक नोंदवही तपासून त्याप्रमाणे संबंधीत प्रस्तावाचे संबंधात अभिलेख्यांची तपासणी स्वत: अपीलकर्ता यांनी करावी.

२) सदरच्या तपासणी करीता अपीलकर्ता यांनी कार्यालयीन वेळेत तारीख व वेळ ही जन माहिती अधिकारी यांना कळवावी व त्याप्रमाणे तपासणी करुन माहिती उपलब्ध असल्यास ती घ्यावी व तशी पोच द्यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :- ०८.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक ४६४/२००७**

**१) श्री साहेबराव सखाराम गायकवाड,**
**रा. वार्ड नं.२, गजानन नगर,**
**एस.एस.ई.बी.खेडे विभागाजवळ,**
**चिखली जि. बुलढाणा.** **तक्रारदार**

**<u>वि रु ध्द</u>**

**२) जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी,**
**पंचायत समिती, देऊळगांवराजा, जिल्हा बुलढाणा.** **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक १३.१०.२००८ )**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांच्या अपीलक्रमांक १६१५/२००७ च्या संदर्भामध्ये दिनांक १०.६.२००८ रोजी आदेश क्रमांक २ प्रमाणे अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २१.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेश देण्यात आलेले होते. सदरचे आदेश गैरतक्रारदर यांच्य म्हणण्याप्रमाणे दिनाक ५.७.२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात ९.७.२००८ रोजी प्राप्त झाले होते. परंतु ते स्वत: प्रशासकिय दौ-यावर असल्यामुळे व त्यानंतर संबंधीत लिपिक हे रजेवर असल्यामुळे व रजेवरुन परत आल्यानंतर निवडणुकीच्या कामकरीता व्यस्त असल्यामुळे सदरची माहिती ही मुख्याध्यापक यांचे कार्यालयातून मागवून उपलब्ध करुन देण्यास दिनांक २५.८.२००८ रोजी पर्यंतचा विलंब

झालेला आहे. तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक १०.६.२००८ रोजी दिलेले आदेश त्यांना दिनांक ३.७.२००८ रोजी उपलब्ध झाले. व दिनांक ४.८.२००८ पर्यंत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे दिनांक ८.८.२००८ रोजी तक्रार दाखल केली आहे. जन माहिती अधिकारी यांचा वरीलप्रमाणे जो खुलासा आहे तो जरी योग्य असला तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे आयोगाचे आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जी काळजी घ्यावयास पाहिजे ती काळजी घेतलेली दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी हे संपूर्ण कनिष्ठ कर्मचा-यांवर अवलंबून आहे असे दिसून येते. त्यातही तक्रारदार यांना जी महिती उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती त्याप्रमाणे ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. तक्रारदार यांच्या दिनांक २१.११.२००६ च्या अर्जामध्ये सप्टेंबर, २००६ ते नोव्हेंबर, २००६ या मासिक सभेच्या इतिवृत्ताची मागणी त्यांची दिसून येते. व त्याप्रमाणे त्या मासिक सभेच्या इतिवृत्ताची छायांकित प्रत त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तीन महिन्यामध्ये मासिक सभा झाली असेल तर त्या मासिक सभेतील इतिवृत्ताची प्रत किंवा तीन महिन्याच्या कालावधीत मासिक सभा झाली नसेल तर तशा प्रकारे तक्रारदार यांना कळविणे आवश्यक होते. व तसे कळविलेले नसल्यामुळे तक्रारदार यांची तक्रार आहे.शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही केली किंवा नाही याबबत राज्य महिती आयोगास कोणत्याही प्रकारची चौकशी करता येत नाही. परंतु त्याबाबतची कार्यवाही झाली नसेल तर संबंधीत योग्य त्या अधिका-याकडे तक्रारदार यांनी तक्रार करणे आवश्यक असते. व त्यामुळे तक्रारदार यांना दिनांक ७.१२.२००६ रोजी संबंधीत माहितीच्या संदर्भामध्ये तक्रारदार यांना जी माहिती, म्हणजे कोणताही अहवाल मुख्याध्यापकाच्या संदर्भात या कार्यालयास अद्यापपर्यंत मुख्याध्यापक

यांच्याकडून प्राप्त झालेला नाही असे कळविलेले दिसून येते. तरी सुध्दा सदरची महिती त्यांना वर नमूद केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व आतापर्यंत ती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जन माहिती अधिकार तथा गट शिक्षणाधिकरी व या संबंधात ज्यांचे ज्यांचे सहाय्य घेतले असेल त्यांना सुध्दा अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून ते दोषी आढळून येतात व त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक राहील. अधिनियमांत दिलेल्या मुदती किंवा आयोगाचे निर्णय हे प्रशासकीय अडचणींमुळे निष्प्रभ होत नाहीत.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार ही मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना सप्टेंबर, २००६ ते नोव्हेंबर, २००६ पर्यत मासिक सभेचे इतिवृत्त उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) संबंधीत जन माहिती अधिकरी व ज्या कर्मचा-यांचे सहाय्य घेतले आहे असे कर्मचारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची शिफारस करण्यात येते. सदरची कार्यवाही ही अधिकारी कर्मचारी यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे मुख्य कर्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी करावयाची आहे.

२) निर्णयाची एक प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना देण्यात यावी.

**दिनांक :- १३.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**अपील क्रमांक २१०७/२००७**
**अपील क्रमांक २१०८/२००७**

**१) श्री जयवंत मधुकर मिश्रा,**
**प्लॅाट नं. १६, जवाहर कॅालनी,**
**मु.पो. पुलगांव, ता. देवळी, जिल्हा वर्धा-४४२३०२**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.)**
**(नगर परिषद प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय,**
**नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद पुलगांव, ता. देवळी, जिल्हा वर्धा.**

निर्णय
(दिनांक १८.१०.२००८)

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या दोनही अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी फॅक्सद्वारे तब्बेत बरी नसल्यामुळे मी सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही करीता विनंती की, उपरोक्त सुनावणीसाठी पुढील तारीख देण्याची कृपा करावी असा अर्ज आयोगाकडे दिलेला आहे. परंतु, माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची असल्यामुळे अपीलकर्ता यांचा अर्ज नाकारण्यात येवून सुनावणी घेण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२००८ रोजी माहितीच्या अर्जाच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयातील मुख्य लिपिक श्री लांडगे यांच्या हाताचा चावा घेतल्यामुळे त्यांच्या विरुध्द एफ.आय.आर. दाखल केला आहे. व एफ.आय.आर. ची प्रत

आयोगाचे निदर्शनास आणली असून छायांकित प्रत दाखल केली आहे. . उत्तरवादी हजर आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपील क्रमांक २१०७/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००७ रोजी खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "(१) दिनांक ७.१०.२००३ ते ३१.८.०४ चे कालावधीतील मुख्याध्यापक चे नांव? (२) सकस अन्न आहार घेतलेचे रजिस्टर कोणाकडे आहे? (३) मोजणेचे रजिस्टर केव्हा पासून सुरु करण्यात आले? (४) योजनेचे संचलन कोण करीत होते? (५) योजनेसाठी वरील कालावधीत किती अन्न आले (६) पात्र विद्यार्थी किती होते? (७) विद्यार्थ्यांची यादी पूर्ण नांवासहित (८) सदर योजनेचे खर्चासाठी किती रुपये अनुदान मिळाले? (९) वरील अनुदान कोणी स्विकारले (१०) सदर योजनेचे संचालन करणारे संचालकाला किती मानधन मिळाले? (११) मानधनाची रक्कम कोणी घेतली (१२) सदर योजनेवर किती खर्च करण्यात आला (१३) अनुदान, मानधन व खर्चा बाबतचे दस्तऐवज (१४) सदर सकस आहार योजनेचे रजिस्टरची झेरॉक्स प्रत"

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६.६.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी शास्तीची विनंती केली होती असे दिसून येते. द्वितीय अपीलाचा निर्णय दिनांक १६.७.२००७ रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थी यांनी विहित मुदतीच्या नंतर माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांना विलंबाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येत नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. व सदरच्या निर्णयाने

अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. द्वितीय अपीलामध्ये १२ दिवस उशिरा माहिती मिळाली असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.५.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री विद्यासागर बी. चव्हाण तथा नायब तहसिलदार यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

खुलासा : "(१) मी वर्धा जिल्हयात सन डिसेंबर २००२ पासून नायब तहसिलदार या पदावर कार्यरत असून माझ्याकडे मुख्याधिकारी, नगरपरिषद या पदाचा दिनांक २७.९.२००७ या कालावधीत अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता. याच कालावधीत मुख्य लिपिक पदावर असलेले श्री डी.के. काळमेघ हे सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. (नंतर श्री काळमेघ यांना माहितीचा अधिकाराबाबतच्या श्री महेंद्र शेंडे प्रकरणांत अक्षम्य हयगय केल्याच्या कारणासोबतच इतर अनेक कारणामुळे निलंबित करण्यात आले होते.)

(२) अर्जदार यांनी दिनांक २५.५.२००७ च्या अर्जान्वये सकस आहार योजनेबातची मागितलेली माहिती ही मुख्याध्यापक, नगर परिषद हायस्कुल या त्रयस्थ पक्षाशी संबधित होती. अर्जदार यांचा अर्ज दिनांक २८.५.२००७ रोजी संबंधित मुख्याध्यापकाकडे हस्तांतरीत करण्यात आला होता. मुख्याध्यापक यांनी सदर माहिती दिनांक ७.७.२००७ रोजी उपलब्ध करुन दिल्यानंतर अर्जदार यांना पुरविण्यात आली होती. सदर माहिती १२ दिवस विलंबाने देण्यास मुख्याध्यापक हेच जबाबदार आहेत.

(३) मा. उपआयुक्त तथा अपीलीय अधिकारी, न.प. प्रशासन, नागपूर यांनी दिनांक १६.७.२००७ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये अपीलार्थीने मागणी केलेली माहिती पुर्णपणे उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे विलंबाचा कालावधी क्षमापित करुन प्रकरण निकाली काढले होते.

(४) अर्जदार श्री जयवंत मधुकर मिश्रा हा निव्वळ मानसिक त्रास देण्याच्या दुषित हेतूने वारंवार मोठी व जटील स्वरुपाची माहिती मागण्याच्या सवयीचा असून नं.प. कर्मचा-यांना त्याने त्रस्त केलेले आहे. उपलब्ध माहिती घेण्यास सुध्दा तो व त्याचे कुटूंबिय जाणिवपुर्वक टाळाटाळ करतात. अर्जदार यांना संपुर्ण अचूक माहिती पुरविण्यात आली असून हेतूपुरस्सर विलंबाने देण्यात आलेली नाही.

(५) सदर कालावधी हा शाळा महाविद्यालयात प्रवेशाचा कालावधी असल्याने मी उत्पन्नाचे प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे इत्यादी शालेय विद्यार्थ्यांच्या दाखल्याचे कामात तसेच तहसिल कार्यालय देवळी येथे ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुक २००७ मध्ये निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून पुर्णवेळ व्यस्त असल्याने आणि माझ्याकडे जन सामान्यांच्या दैनंदिन गरजेशी निगडीत असलेला निरीक्षण अधिकारी (पुरवठा) या पदाचा अतिरिक्त कार्यभार असल्याने तत्कालीन मुख्य लिपिक श्री काळमेघ यांचीच नगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजात महत्वाची भूमिका होती."

५. उत्तरवादी यांच्या खुलाशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांचा माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्यात कोणत्याही प्रकारचा दोष आहे असे आढळून येत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक २१०८/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००७ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पुलगांव यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : " श्री मदनलाल भागचंद बजाज विज्ञान शिक्षक नगर परिषद हायस्कुल पुलगांव यांनी (१) दि. १ जानेवारी, २००३ ते दिनांक ३१ मार्च, २००७ पर्यंत संघटना किंवा इतर बाबी व सुनावणीसाठी शिक्षणाधिकारी (माध्य.) शिक्षण उपसंचालक विभागीय सचिव म.रा.माध्य.उच्च माध्य शिक्षण मंडळ किंवा इतर संबंधीत अधिका-यांचे कार्यालयात कार्यालयीन कामासाठी प्रवास व भेटी दिल्या बाबत केलेला प्रवासाची तारीखवार व वेळेची माहिती.

(२) दिनांक १.१.२००३ ते दिनांक ३१ मार्च २००७ पर्यंत केलेल्या प्रवासाबध्दल व घेतलेल्या प्रवास भत्ता व दैनिक भत्याची तारीखवार माहिती व देयकाची झेरॅाक्स प्रत.

(३) दिनांक ७.१०.२००३ ते दिनांक ३१ मार्च, २००७ पर्यंत श्री बजाज ने शालेय स्टेशनरी साहित्य व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी घेतलेल्या अग्रीम रकमा व इतर रकमा खर्च केल्याचे देयकाची तारीखवार माहिती व दस्तऐवजाची झेरॅाक्स प्रत.

(४) श्री बजाज विज्ञान शिक्षकांचे शैक्षणिक सत्र २००२-२००३ ते शैक्षणिक सत्र २००६-२००७ चे ३१ मार्च, २००७ पर्यंतचे वार्षिक नियोजन व दैनिक पाठ टाचणाची तारीखवार झेरॅाक्स प्रत.

(५) श्री बजाज विज्ञान शिक्षकाने शाळेचे कनिष्ठ महाविद्यालय व हायस्कुल चे टर्म फी चे खात्यातून काढलेल्या रकमा व खर्चाची माहिती व दस्तऐवज.

(६) श्री बजाज विज्ञान शिक्षकाचे पर्यवेक्षक व मुख्याध्यापकाचे पदोन्नती प्रस्तावासोबत पाठविलेल्या जेष्ठता यादीला कोणते ठरावा प्रमाणे निश्चिती व मान्यता देण्यात आली व शिक्षणाधिकारी (माध्य.) वर्धा जेष्ठता योदीला कोणत्या पत्राने व आदेशाने मान्यता प्रदान केली त्याची झेरॉक्स प्रत.

(७) श्री बजाज यांनी दिनांक १.१.२००३ ते दिनांक ३१ मार्च २००७ पर्यंत शालेय किंवा संघटनेचे कामाने संबंधीत कार्यालयाला उपस्थिती बाबतचे उपस्थिती प्रमाणे पत्रांची झेरॉक्स प्रत.

(८) श्री बजाज यांची शिक्षक असतांना वेतन वाढीची दिनांक कोणती होती.

(९) श्री बजाज यांना पर्यवेक्षकाची पदोन्नती कोणत्या दिनांका पासून देण्यात आली व कोणत्या दिनांका पर्यंत पर्यवेक्षक होते.

(१०) श्री बजाज यांना पर्यवेक्षकाचे पदभार सांभाळण्यासाठी अतिरिक्त वेतन केव्हा पासून व कोणत्या दिनांका पर्यंत देण्यात आले.

(११) पर्यवेक्षकाचे पदोन्नती ठराव केव्हा पारित झाला.

(१२) श्री बजाज यांना मुख्याध्यापकांचे पदावर दि. ७.१०.२००३ ते ३१.३.२००४ पर्यंत कोणते वेतनमान, अतिरिक्त वेतन किंवा भत्ते देण्यात आले.

(१३) श्री बजाज यांना शैक्षणिक सत्र २००२-२००३, २००३-२००४, २००४-२००५, २००५-२००६ व २००६-२००७ या वर्षात किती किती रुपयाची वेतन वाढ कोणत्या महिन्यात कोणत्या वर्षात कोणत्या दिनांक पर्यंत देण्यात आल्या व कोणकोणते वेतनमान किंवा वेतन श्रेणी देण्यात आल्या.

(१४) श्री बजाज मुख्याध्यापकाचे पदावर केव्हा पदोन्नत झाले व त्यांचे पदोन्नतीचा ठराव केव्हा पारित झाला.

(१५) श्री बजाज कोणत्या दिनांकपर्यंत मुख्याध्यापक पदावर होते.

(१६) सद्य स्थितीत ते कोणत्या पदावर आहेत व कां

(१७) शालेय टाईम मार्क रजिस्टरचे हायस्कुल विभागाचे शिक्षकांचे दिनांक १.१.२००३ ते दिनांक ३१ मार्च, २००७ पर्यंतचे प्रत्येक महिन्याचे पानाची झेरॉक्स प्रत.

(१८) दिनांक ३१.५.२००४ रोजी स्टेट बँकेचा डी.डी.क्रमांक ४४३३९६ रक्कम रुपये ५३४७/- रुपये कोणाचे खात्यात जमा करण्यात आला. व त्याचा खर्च कोणी केल्या?

(१९) श्री बजाज पदोन्नतीची वेतन श्रेणी घेत आहे काय?"

७. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३०.४.२००७ रोजी २ मुद्दे सोडून अपीलकर्ता यांना मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००७ रोजी उप आयुक्त तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यामुध्ये मुद्या क्रमांक ३ ची माहिती मिळाली नाही असे त्यांनी नमूद केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.७.२००७ रोजी दिलेला असून विहिती मुदतीनंतर माहिती पुरविण्यात आल्याचे सिध्द होत असल्यामुळे सदरचे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे. असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

८. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला दिसून येतो

खुलासा :" मी जयवंत मिश्रा माजी मुख्याध्यापक न.प. हायस्कुल पुलगांव यांनी उक्त हायस्कुल मध्ये कार्यरत लिपिक श्री ठाकूर यांचे बाबत माहितीच्या अधिकारा अंतर्गत माहिती मागितली.

संबंधीत माहिती अधिकारी यांनी श्री मिश्रा यांना माहिती वेळेत दिल्यानंतर मिळालेली माहिती चुकीची अपूर्ण असल्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचेकडे अपील सादर केले.

अपीलाचे सुनावणी संदर्भात दि. १५.१०.०८ रोजी श्री मिश्रा माझे कक्षात आले असता दि. २३ व २४ ऑक्टोबर, २००८ रोजी सुनावणीसाठी नोटीस निर्गमित करण्याबाबत मुख्यलिपिक श्री दिलीप लांडगे यांना कक्षात बोलावून कारवाई करण्याबाबत निर्देश दिले. प्रकरणाबाबत श्री मिश्रा, श्री लांडगे यांचे बरोबर त्यांचे टेबलावर जाऊन बाचाबाची झली असून श्री मिश्रा यांनी श्री लांडगे यांचा बोटाचा जोरदार चावा घेतला. याबाबत पुलगांव पोलीस स्टेशन मध्ये २३९/०८ दि. १५.१०.०८ अन्वये पहिली खबर दर्ज करण्यात आली असून त्याची छायांकित प्रत यासोबत सादर करण्यात येत आहे.

माहितीच्या अधिकारा अंतर्गत वरील प्रमाणे दडपण, दहशत माजविण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी कृपया वरील घेटनेचा विचार करावा, ही विनंती."

९. जन माहिती अधिकारी यांच्या खुलाशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे व विलंबाचे कारण सुध्दा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले असल्यामुळे व ते समाधानकारक असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

१०. अपीलकर्ता यांचा दिनांक ४.७.२००७ चा अर्ज उप आयुक्त तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांना केलेला आहे. व त्यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी दंडाची रक्कम वसुल करुन त्यांना देण्यात यावी, अशी विनंती केलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांची माहिती

मागण्याचा उद्येश हा स्पष्ट होतो व अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे हे अपेक्षित नाही. याचा अर्थ अपीलकर्ता हे अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर करीत आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही.

आदेश

१) अपील क्रमांक २१०७/२००७ व अपील क्रमांक २१०८/२००७ मध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक : १८.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिी आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**अपील क्रमांक २१०४/२००७**

**१) श्री चित्रेशेखर ज्ञानोदय गावंडे,**
**द्वारा श्री कुंजविहारी दाजीबा गावंउे यांचे घराजवळ,**
**एकोरी वार्ड, एकोरी मंदीराचे मागे, चंद्रपूर-४४२४०२.**

**विरुध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक,**
**अहमदनगर जिल्हा सहकारी कृषी ग्रामिण बहुउ्देशिय विकास बँक मर्या.**
**अहमदनगर, कोर्ट गल्ली, पटवर्धन वाडा, जिल्हा अहमदनगर.**

**निर्णय**
**(दिनांक १८.१०.२००८)**

**अपीलक**र्ता यांनी दिनांक ९.७.२००७ रोजी राज्य माहिति आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज ठेवण्यात आली होती. परंतु, अपीलकर्ता यांनी आयोगाचे कार्यालयास त्यांचे पत्र दिनांक ३.१०.२००८ (रुपये पाच चा कोर्ट फी स्टँम्प लावून) अन्वये कळविले आहे की, "ज्या कारणाकरीता व हेतुकरीता अपील दाखल करण्यात आली होती तो हेतु उद्येश निकाली निघून माझी सदर प्रकरणात संबंधीत अधिका-यां विषयी कोणतीही उजर, तक्रार राहिलेली नाही. तसेच या प्रकरणात माझे समाधान झालेले असल्याने अपील क्रमांक २१०४ च्या अनुषंगाने दिनांक १८.१०.२००८ रोजी ठेवण्यात आलेली सुनावणीची तारीख रद्य करण्यांत येवून प्रकरण फाईल करण्याची विनंती आहे. जेणे करुन त्यांना सुध्दा जाण्यायेण्याचा होणारा त्रास टाळता येईल." अपीलकर्ता यांची विनंती मान्य करण्यात येत असून सदरचे अपील अपीलकर्ता यांच्या विनंतीप्रमाणे निकाली काढण्यात येत आहे.

**दिनांक : १८.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य मार्हिी आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**पुर्नविलोकन अर्ज क्रं.१२/२००७**

**१) श्री पी.पी. निकास,**
**शिक्षण अधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, अमरावती.**
(तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी जि.प.नागपूर) अर्जदार

**विरुध्द**

**२) जन माहिती अधिकारी (विद्यमान),**
**शिक्षण विभाग प्राथमिक, जि.प., नागपूर.**

निर्णय
**(दिनांक २०.१०.२००८)**

अर्जदार यांनी दिनांक १०.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक १४१४/२००७ मधील आदेशाचे पुर्नविलोकन करण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. सदरच्या अर्जाची सुनावणी आज घेण्यात आली. अर्जदार हजर आहे व गैरअर्जदार हजर आहे. अर्जदारातर्फे त्यांचे वकील श्री राजेंद्र पांडे हजर आहे. त्यांनी तोंडी युक्तिवाद केला.

२. अपील क्रमांक १४१४/२००७ मध्ये दिनांक २१.४.२००८ रोजी आदेश क्रमांक २ मध्ये "अपीलकर्त्यांच्या दिनांक १९.६.२००६ च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे" असे आदेश पारित करण्यात आलेले आहे. व सदरच्या आदेशाचे पुर्नविलोकन करावे याकरीता अर्जदार यांनी वरील प्रमाणे अर्ज दिलेला आहे. परंतु, अधिनियमाच्या कलम २० (२) प्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करण्यात आलेली असली तरी संबंधीत अधिका-याच्या संबंधामध्ये जे सेवा नियम किंवा शिस्तभंगाच्या संबंधातील जे नियम त्यांना लागू असतील त्या नियमांमध्ये दिलेल्या

कार्यपध्दतीप्रमाणे प्राथमिक चौकशी करुन व नंतर आरोप ठेवून मुख्य चौकशी करणे अपेक्षित असल्यामुळे प्राथमिक चौकशीच्या वेळेस संबंधीत जन माहिती अधिकारी यांना ते दोषी आहे किंवा नाही याबध्दलचे त्यांचे म्हणणे मांडता येईल व त्याप्रमाणेच सदरच्या निर्णयाची अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे. व त्यामुळे पुन्हा आयोगाकडे संबंधीत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुण घेवून पुर्नविलोकन करण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे सदरचा अर्ज हा खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अर्जदार यांचा अर्ज खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक : २०.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिी आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-**

**तक्रार क्रमांक १४१/२००७**

**१) श्री रघुनाथ जगन्नाथ कौलकार,**
**सुपो कॅालनी, जळगांव जामोद,**
**ता. जळगांव जामोद, जि. बुलढाणा.**
**तक्रारदार**

**विरुध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद जळगांव (जामोद) जि. बुलढाणा.**
**गैरतक्रारदार**

**निर्णय**
**(दिनांक २०.१०.२००८)**

तक्रारदार यांनी दिनांक २०.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) प्रमाणे तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची आज सुनावणी घेण्यात आली. तक्रारदार विना अनुमती गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत. तक्रारदार यांनी तक्रारीसोबत कोणत्याही प्रकारचे कागदपत्र जोडलेले नाही, तरी सुध्दा गैरतक्रारदार यांचेकडून खुलासा मागविण्यात आला होता, तो खुलासा खालीलप्रमाणे आहे.

१. खुलासा : "उपरोक्त संदर्भाकिंत विषयानुसार श्री रघुनाथ जगन्नाथ कौलकार रा.जळगांव जामोद, जि. बुलढाणा हयांनी आपले आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीचा स्वयंस्पष्ट अहवाल अभिप्रायासह खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

श्री रघुनाथ जगन्नाथ कौलकार हयांच्या पत्नी सौ. सुनिता रघुनाथ कौलकार हया या नगर परिषदेच्या मराठी प्राथमिक शाळा क्रं. २ येथे प्राथमिक सहाय्यक शिक्षिकेच्या पदावर

कार्यरत आहेत. त्यांचे पती श्री रघुनाथ कौलकार (अर्जदार) हे श्री शिवाजी हायस्कुल बडोदा, ता. मुक्ताईनगर, जि. जळगांव खा. येथे माध्यमिक शिक्षकाचे पदावर कार्यरत आहेत.

श्री रघुनाथ कौलकार हे आजारी असतांना त्यांचे औषधोपचारांसाठी झालेल्या खर्चाची बिले त्यांची पत्नी सौ. सुनिता रघुनाथ कौलकार हयांनी मा. जिल्हा शल्य चिकित्सक बुलढाणा यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्याकरीता दि. ३.१.२००७ रोजी या कार्यालयास सादर केले. मा. शिक्षण अधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, बुलढाणा यांचे दि. १८.२.२००६ चे परिपत्रकानुसार त्यांची बिले व सोबत जोडण्यात आलेल्या कागदपत्राची तपासणी करुन बिला मधील त्रुटी पुर्तता करणेकरीता जा.क्रं. १०१ दि. २.२.२००७ रोजी त्यांना पत्र देण्यात आले. त्यांनी दि. १३.२.२००७ रोजी काही त्रुटीची पुर्तता करुन दि. १३.२.२००७ रोजी प्रस्ताव या न.प. कार्यालयास सादर केला. परंतु पुढील त्रुटीची पुर्तता केलेली नव्हती. त्यांचे डिस्चार्ज कार्डानुसार दि. ४.११.२००६ ते ७.११.२००६ पावेतो आजारी असुन हॉस्पीटलमध्ये भ्रती होते. परंतु मुख्याध्यापक श्री शिवाजी हायस्कुल बडोदा हयांनी ते आजारी असतांना दि. ४.१०.०७ ते २०.१०.२००७ हया कालावधीत रजेवर असल्याचे त्यांचे पत्रात नमुद केले आहे. संबंधीत मुख्याध्यापक यांना दि. २६.९.२००७ रोजी पत्र देवून त्यांचे रजेबाबतचा निश्चित कालावधीबाबत विचारणा केली असता त्यांनी दि. ४.११.२००६ ते २०.११.२००६ हा त्यांचे रजेचा कालावधी असल्याबाबत दि. १.१०.२००७ रोजीचे पत्रानुसार या न.प.ला कळविले. त्यामुळे प्रकरण सादर करतांना त्यांनी चुकीची माहिति सादर केली. तसेच त्यांचे डिस्चार्ज कार्ड नांवात खोडतोड सुध्दा केलेली आहे.

संबंधीत वैद्यकिय खर्चाचे प्रतीपुर्ती प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता करण्यासाठी त्यांना कळविले असता त्यांनी त्रास देण्याचे उद्येशाने माहितीचे अधिकारात माहिती विचारली व माहिती मिळाण्याचा विहित कालावधी संपण्यापुर्वी मा. अपीलीय अधिकारी अमरावती विभाग, अमरावती हयांचेकडे अपील दाखल केले. या प्रकरणात दि. २०.४.२००७ रोजी पक्षकारासमोर सुनावणी होऊन मा. अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) अमरावती विभाग, अमरावती यांनी त्यांचे अपील प्रकरण क्रं. १०१/न.पा.प्र./उपआ/सा.प्र./उ.ले.पा./कावी १८.१.२००७ नुसार अपीलार्थी यांना माहिती पुरविण्यात आल्यामुळे त्यांचे अपील खारीज केले आहे.

अर्जदाराने दि. १.३.२००७ व २७.९.२००७ दोन वेळेस माहितीचे अधिकारात माहिती मागितली असतांना त्यांना दोनही वेळेस मुदतीचे आत व सत्य माहिती पुरविण्यात आली. यामध्ये कोणतीही खोटी वा दिशाभूल करणारी माहिती पुरविण्यात आलेली नाही. तसेच त्यांचेकडून माहितीचे शुल्क रु. २० प्रती प्रमाणे योग्य आकारले आहे.

त्यांचे वैद्यकिय खर्चाच्या प्रतीपुर्तीची देयके तपासणीसाठी जा.क्रं. ४८२ दि. ३०.३.२००७ नुसार मा. जिल्हा शल्य चिकित्सक, बुलढाणा यांचेकडे पाठविण्यात आली. नंतर जिल्हा शल्य चिकित्सक बुलढाणा यांचेकडून त्यांचे बिलाची तपासणी होऊन दि. २१.५.२००७ रोजी हया न.प. कार्यालयास प्राप्त झाली. वरील बिले पगार करणेसाठी सन २००७-०८ चे शिक्षण विभागाचे खर्चाचे अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येवून मा. शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग, अमरावती हयांना अनुदार मागणी करण्यात आली. त्यानंतर त्यांना त्यांचे वैद्यकिय खर्चाच्या प्रतीपुर्ती बिलाची रक्कम रु. ७१०१ प्रमाणक क्रं.१७९ दिनांक १७.१२.२००७ नुसार रक्त रकमेचा धनादेश क्रु. १०८५१९ दि. १७.१२.२००७ नुसार प्रदान करण्यात आली.

सदर प्रस्तावामध्ये नियमाप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे. देयक प्रलंबीत ठेवण्यात आलेले नाही. तसेच त्यांना कोणतीही लाच मागितली नाही. वरील आरोप त्यांनी द्वेषबुध्दीने खोडसाळपणे मुख्याधिका-यास बदनाम करण्याचे उद्येशाने केलेला खोटा आरोप आहे. यामध्ये कुठलेही तथ्य नाही.

वरील पार्श्र्वभूमी लक्षात घेता अर्जदाराने वैद्यकिय खर्चाच्या प्रतीपूर्तीचा प्रस्ताव कोणत्याही त्रुटी न काढता व नियमाप्रमाणे कारवाई न करता मंजूर करावा या उद्येशाने तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराच्या आजारी कालावधीत व त्याचे शाळेवरुन घेतलेल्या रजेच्या कालावधीत तफावत आढळून येणे, डिस्चार्ज कार्डवर खोडतोड असणे असे असुन सुध्दा त्यांनी त्रुटी पुर्ण न करता माहितीचे अधिकारात माहिती मागवून विहित मुदतीचे आत त्यांनी अपील दाखल केले यावरुन अर्जदाराचा उद्येश हा त्रास देण्याचा दिसून येतो. तसेच अर्जदाराने दिशाभुल करणारा खोटा आरोप लावून हेतुपुरस्पर आपले आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. तरी सदर तक्रार अर्ज खारीज करण्यात यावा, ही विनंती. तसेच खोटी तक्रार केल्याबाबत अर्जदारावर योग्य ती कार्यवाही व्हावी ही विनंती."

२. सदरच्या खुलाशावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांना दिनांक १.३.२००७ व २७.९.२००७ रोजी माहितीच्या अधिकारात माहिती मागितलेली होती व त्याप्रमाणे त्यांना दिनांक २.४.२००७ रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच दिनांक २४.१०.२००७ रोजी सुध्दा २०/- रुपयाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक २४.१०.२००७ रोजी एकुण ७ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सुध्दा दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक

२५.४.२००७ रोजी देण्यात आलेला असून त्यांना आवश्यक ती माहिती विहित मुदतीत कळविण्यात आलेली होती व त्यामुळे अपील खारीज करण्यात आलेली होती.

यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची तक्रार ही खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत तक्रारदार व गैरतक्रारदार यांना देण्यात यावी.

**दिनांक : २०.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य मार्हिी आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**अपील क्रमांक २१८९/२००७**

**१) श्री सुरेश काशिनाथ गददेवार**
**C/o लक्ष्मीकांत शांतलवार, गांधीगेट जवळ,**
**दक्षीणामुर्ती चौक, महाल नागपूर.**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.)**
**नगर पालिका प्रशासन, नागपूर.**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, मुल, ता. मुल, जिल्हा चंद्रपूर.**

**निर्णय**
**(दिनांक २१.१०.२००८)**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. त्यांचे ऐवजी कनिष्ठ अभियंता हजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहे व त्यांनी कागदपत्रे दाखल केली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद मुल यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "आपले कार्यालयीन पत्र जा.क्रं.१०३ दि. ३.५.२००७ अन्वये फक्त नवीन मकान रेस्टारंटचे मंजूरी आदेश व नकाशा पाठविलेला आहे. परंतु माझ्या

मागणी प्रमाणे माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे तरी खालील प्रमाणे माहिती पुरविण्यात यावी.

(१) भाग्यरेखा सभागृह/नविन मकान प्लॅट क्रं. ३,४,५,६,७ वर आहेत हे प्लॅट ज्या लेआऊटचे आहेत त्या लेआऊटच्या नकाशास नगररचना विभागांनी मंजूरी दिलेल्या नकाशाची प्रत.

(२) वरील लेआऊटला जिल्हाधिकारी/उपविभागीय अभियंता चंद्रपूर यांनी अकृषक म्हणून मंजूरी दिलेल्या आदेशाची प्रत.

(३) भाग्यरेखा सभागृह (मंगल कार्यालय) १९९९/२००० ते २००२/२००३ मध्ये सुरु करण्यांत आलेले आहे, त्या मंगल कार्यालयाच्या इमारत बांधकामास मंजूरी दिलेल्या नकाशाची प्रत.

(४) सभागृह/नविन मकान यांच्या बांधकामास ज्या कागदपत्रांन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे त्या सर्व कागदपत्रांची सत्यप्रत.

(५) ५ प्लॅटच्या मधून पूर्व पश्चिम रस्ता असतांना कंपाऊंड वाल टाकून रस्ता बंद करण्यास आदेश आहे ते करण्यास दिलेल्या मंजूरीची प्रत.

(६) विद्युत विभागाची हायटेंशन पावर लाईन त्या प्लॅट वरुन गेलेली असतांना विद्युत लाईल खाली इमारत बांधकामास मंजूरी प्रदान करतांना विद्युत विभागाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेतलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

(७) भाग्यरेखा सभागृह/नवीन मकान (रेस्टारंट) बांधकामास मंजूरी दिलेल्या प्रमाणेच बांधकाम करण्यात आलेले आहे ते तपासणी अहवालाची प्रत.

(८) भाग्यरेखा सभागृह (मंगल कार्यालय) ची पार्कींग व्यवस्था करीता दिलेल्या परवानगीची प्रत.

(टिप : वरील माहिती परिच्छेद निहाय व मागविलेल्या सत्यप्रतीसह देण्यात यावी.)"

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.७.२००७ रोजी देण्यात आलेला असून विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे विना मुल्या माहिती पुरविण्यासाठी आदेश देण्यात आलेले असून अपील मंजूर करण्यात आलेली दिसून येते. परंतु सदरच्या निर्णयाप्रमाणे सुध्दा अपीलकर्ता यांना ७ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. मात्र, दिनांक २६.७.२००७ रोजी उपलब्ध असलेली माहिती आपणाकडे पाठविण्यात येत आहे, असे पत्र अपीलकर्ता यांना दिलेले दिसून येते व सदरचे पत्र हे सौ. स्मिता सुरेश गददेवार यांनी स्विकारलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, सदरची जी माहिती उपलब्ध करुन दिली ती रेस्टॉरंटच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिली होती. भाग्यरेखा सभागृहाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी स्पष्टपणे अर्जामध्ये रेस्टारंटची माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु, माझ्या मागणी प्रमाणे माहिती देण्यासाठी टाळाटाळ केलेली आहे. तरी, खालीलप्रमाणे माहिती पुरविण्यात यावी, असे स्पष्ट असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. कनिष्ठ अभियंता यांनी अपीलकर्ता यांना सदरच्या अपीलाच्या सुनावणीच्या आधी दिलेल्या पत्राची प्रत आयोगाच्या

निदर्शनास आणली व भाग्यरेखा सभागृहाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही, असे त्यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. व यावरुनही सदरची माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे, असेच अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. व त्याबाबत कनिष्ठ अभियंता सुध्दा माहिती उपलब्ध नाही असेच सांगत आहे. यावरुन सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ होत आहे असाच निष्कर्ष काढावा लागतो व त्याकरीता संबंधीत जन माहिती अधिकारी व माहिती उपलब्ध करुन देण्यास सहाय्य करणारे संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी यांना अधिनियमाच्या कलम ५(५) प्रमाणे माहिती अधिकारी समजून ते दोषी आढळून येत आहेत असाच निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व अधिनियमाच्या कलम २०(१) प्रमाणे ते शास्तीस सुध्दा पात्र आहेत. जन माहिती अधिकारी यांना शास्ती लादण्यापूर्वी त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे बंधनकारक असते. परंतु जन माहिती अधिकारी यांना सदरच्या द्वितीय अपीलाच्या सुनावणीची नोटीस काढण्यात आली होती. परंतु ते किंवा विद्यमान माहिती अधिकारी हजर नाहीत. त्यांना संधी देण्यात आलेली आहे. परंतु त्याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती आयोगापूढे सुध्दा त्यांनी सांगितलेली नाही व त्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.५.२००७ च्या अर्जात मागितलेल्या मुद्येनिहाय माहिती प्रमाणे कागदपत्र किंवा अभिलेखे उपलब्ध असल्यास हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी, उपलब्ध नसल्यास तसे कळवावे.

२) संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक १०.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता ज्यांचे सहाय्य घेण्यात आले आहेत असे अधिकारी किंवा कर्मचारी अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १०००/-(एक हजार फक्त) ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, आयुक्त कार्यालय, नागपूर यांनी चौकशी करुन जबाबदारी निश्चित ठरवून जबाबदार असलेल्या जन माहिती अधिकारी किंवा कनिष्ठ अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" मध्ये जमा करावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक : २१.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिी आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**अपील क्रमांक २१९०/२००७**

**१) श्री संजय अरविंद नेरकर,**
**१९५, लक्ष्मीनगर, नागपूर-४४००२२**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक,**
**प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**गणेशपेठ, नागपूर-४४००१८.**

**३) जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ सांख्यिकी,**
**प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**गणेशपेठ, नागपूर-४४००१८.**

**निर्णय**
**(दिनांक २१.१०.२००८)**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००७ रोजी माहिती अधिकारी, प्रादेशिक सांख्यिकी अधिकारी प्रादेशिक कार्यालय, म.रा.मार्ग परिवहन महामंडळ, नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

१. "List of names of candidates who have applied for the post of conductors in response to the advertisement published in

February २००४ for Bhandara, Chandrapur, Nagpur and Wardha Division.

२. Copies of Marklists of S.S.C. submitted by candidates alongwith application and forwarded by each of the above divisions to the Region Office for working out the weightage of SSC marks.

३. Copies of the weightage prepared by the Region Office and provided to the above divisions under the signature of Shri V.V. Ratnaparkhi, Reg.Mgr., S.T. Nagpur.

४. Copies of monthly work diaries of Shri V.V. Ratnaparkhi, Regional Manager submitted to Hon. Vice Chairman and managing Director, Central Office, w.e.f. १.९.२००६ till date.

५. Copies of Travelling Bills submitted by Shri V.V. Ratnaparkhi, RM and information on actual T.A. bill amount received by him since १.९.२००६ till date.

६. Copies of permission granted by Hon. Vice Chairman and Managing Director, if any, for the merger of २ S.T. Apartments allotted to Shri V.V. Ratnaparkhi Regional Manager.

७. Copy and information on the total amount of deductions made from his salary every month under following sub-titles:

१) House Rent Allowance not paid to him due to occupation of S.T. Quarter

२) Additional deductions made from salary for retaining quarter

८) Please provide information whether deductions shown against item (७) is for Single Quarter or for two quarters merged.

९) Copy of confidential letter No.३३, dt. १९.३.२००५ of Regional Manager, Nagpur, deputing Shri V.B. Marwadkar, DPO Off. S.T. Bhandara, for inspection of Establishment Section w.e.f.२१.३.२००५ to २४.३.०५

१०) Copy of Report submitted by Shri V.B. Marwadkar, DPO (Off), S.T. Bhandara to Regional Manager, Nagpur on the inspection of Establishmet Section, S.T. Nagpur.

११) Copy of Action Taken Report by Shri V.V. Ratnaparkhi, Regional Manager, S.T. Nagpur on the report submitted by Shri V.B. Marwadkar, eg. Copy of departmental noting or letter written if any by Regional Manager, S.T. Nagpur to the Divisional Controller, S.T. Nagpur or to Central Office for taking remedial/corrective action.

१२) What is the amount of expenditure borne by S.T. Corporation for the inspection carried on by Shri V.B. Marwadkar, for the period between २१.३.२००५ to २४.३.२००५ till the date of submission of report. The information to be submitted under following titles.

१) T.A. bill paid

२) Salary for the period of inspection period till the date of submission of report.

१३) Copy of letter of Regional Manager S.T. Nagpur deputing Shri Rajendra Ramteke, Regional Personel Officer, S.T. Nagpur for carrying out follow up inspection after submission of Report by Shri Marwadkar.

१४) Copy of Report submitted by Shri Rajendra Ramteke, RPO, to Regional Manager S.T. Nagpur.

१५) Information on Action Taken Report by Regional Manager S.T. Nagpur on the inspection report of Shri Rajendra Ramteke.

१६) Information of expenditure borne by the S.T. Corporation by way of payment of salary to Shri Rajendra Ramteke for the period of inspection of Estt. Section of Nagpur Division till submission of report by him.

१७) Copy of letters if any, addressed to Divisional Controller, S.T. Nagpur or any higher authority by Regional Manager, S.T. Nagpur giving the report of Shri V.B. Marwadkar and Shri Rajendra Ramteke for taking remedial/corrective action.

१८) Copy of the Conf.letter No.२०६८ dt. ५.१.२००७ by which committee of Shri R.M. Pawanikar, Regional Engineer alongwith other officers/supervisors constituted for the inspection of Establishment section of Nagpur Division w.e.f. ८.१.२००७ to १३.१.२००७

१९) Copy of Inspection Report submitted by the Shri R.M. Pawanikar Committee to Regional Manager, S.T. Nagpur.

२०) Copy of the letter, if any, addressed to the Divisional Controller, S.T. Nagpur or any higher authority by Regional Manager, S.T. Nagpur, giving report of Shri R.M. Pawanikar Committee for taking remedial/corrective action.

२१) Information on the amount of expenditure borne by S.T. Corporation, under the following titles :१) salary paid to each Officer/Supervisor for the period from ८.१.२००७ to १३.१.२००७ ii) T.A. Bills paid to each officer/supervisor.

२२) Copy of letter of Regional Manager, S.T. Nagpur constitution the Committee of officers/supervisor/employees represented by Shri Anil Wakodikar, Labour Officer, S.T. Chandrapur, for the inspection of Establishment section of Nagpur Division, Nagpr in the month of February/March, २००७.

२३) Copy of the report submitted by the Committee mentioned at (२२) to the Regional Manager, S.T. Nagpur.

२४) Copy of the Action taken Report by Shri V.V. Ratnaparkhi, Regional Manager, S.T. Nagpur on the report submitted by above committee at (२२) alongwith letter if any, written to the Divisional Controller, S.T.Nagpur Or to Central Officer, for taking any remedial/corrective action.

२५) Information on the expenditure borne by the committee at (२२) by way of salary and T.A. Bills paid to the members of Committee for the period of inspection till lthe submission of report.

२६) Copy of Caveat Application filed by Regional Manager, S.T. Nagpur in Bombay High Court, Nagpur Bench, Nagpur against the applicant on ३०.३.२००५ with the help of Adv. Vijay Wankhede.

२७) Information on the amount of bills paid to advocate Shri Wankhede for filling such caveat Application.

२८) Information on the mandatory bus kms. Alongwith bus nos. performed by Shri V.V. Ratnaparkhi wef. १.९.२००६

२९) Information of staff vehicle diaries attached to Region Office."

२. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु सदरचे अपील हे मुदतबाहय असल्यामुळे फेटाळण्यात आलेले दिसून येते व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे दिसून येते.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध कां करुन दिली नाही याबध्दल जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांनी दिनांक २३.३.२००७ रोजी विभाग नियंत्रक, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, नागपूर यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले होते. व सदरच्या पत्राची प्रतिलीपी ही अपीलकर्ता यांना दिल्या होत्या. त्याचप्रमाणे दिनांक १५.३.२००७ रोजी सुध्दा वरिष्ठांनी सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबध्दल मार्गदर्शन मागितले होते. व त्याप्रमाणे दिनांक ३०.३.२००७ रोजी वरिष्ठांनी माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही अशा प्रकारे कळविलेले दिसून येते. मात्र, त्यानंतर सुध्दा दिनांक २०.४.२००७ रोजी प्रादेशिक व्यवस्थापक यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८ (एच) व (जे) अन्वये माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे माहिती अधिकारी यांना कळविले असल्यामुळे दिनांक २१.४.२००७

रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे अंतिमत: कळविण्यात आले होते. दिनांक २०.४.२००७ च्या प्रादेशिक व्यवस्थापक यांच्या पत्रामध्ये अर्जदार हे स्वत: आरोपी असल्याने व सद्या निलंबीत असल्यामुळे सदरची माहिती चौकशीस/तपासणीस बाधक आहे यास्तव त्यांना माहिती देता येणार नाही असे कारण दिलेले दिसून येते. सदरच्या कारणाबध्दल अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, दिनांक १३.३.२००७ रोजी अपीलकर्ता हे निलंबित नव्हते व त्यांच्या विरुध्द आरोप पत्र मात्र देण्यात आले होते. व त्यामुळेच सदरचे उत्तर दिलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या संदर्भात जे आरोपपत्र होते त्याबध्दल कारणाच्या संदर्भामध्ये व मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणताही संबंध नाही. आरोप पत्र हे चालकांच्या भरतीच्या प्रक्रियेच्या संदर्भात होते. मात्र माहिती वाहकांच्या भरतीच्या संदर्भात त्यांनी मागितलेली दिसून येते. दोनही प्रक्रिया हया फेब्रुवारी, २००४ या महिन्यात सुरु झालेल्या होत्या असे दिसून येते. वाहकाची भरती प्रक्रियेशी अपीलकर्ता यांचा संबंध नाही. परंतु संबंधीत कालावधीमध्ये चालकाच्या भरती प्रक्रियेतील घोटाळयाच्या संदर्भात आरोप पत्र दिलेले असल्यामुळे त्या प्रकारचे उत्तर त्यांनी दिलेले आहे, ते योग्य दिसून येते. त्यांनी केलेल्या प्रक्रियेत त्यांना आरोप पत्र दिल्यामुळे त्यांनी दूस-याने केलेल्या प्रकियेची माहिती मागितली आहे असा निष्कर्ष काढण्यास हरकत नाही. म्हणजे व्यापक जनहिताचे दृष्टीने माहिती मागितलेली नसून स्वहितासाठी त्या प्रक्रियेशी संबंध नसतांना निव्वळ त्यांतील अनियमितता झाली असल्यास शोधून काढण्याकरीता माहिती मागितलेली दिसून येते. त्यांचे विरुध्द अनियमिततेबाबत आरोपपत्र दाखल झाले नसते तर त्यांनी ही माहिती मागितली नसती असे त्यांनी मान्य केले.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, आरोपपत्र दाखल केलेल्या कारणांशी व मागितलेल्या माहितीचा काहीही संबंध नाही त्यामुळे सदरची माहिती तपासणी करण्यासाठी अपीलकर्ता यांना परवानगी देण्यास हरकत नाही व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १३.३.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या संबंधीत माहितीच्या नस्तींची तपासणीची परवानगी द्यावी.

२) अपीलकर्ता यांनी संबंधीत नस्तीच्या तपासणीकरीता जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ कळविण्यात यावी व त्या वेळेस तपासणी घ्यावी व तपासणी झाल्यानंतर ज्या कागदपत्रांची त्यांना आवश्यकता असेल त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विना मुल्या उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक : २१.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**अपील क्रमांक २१११/२००७**

**१) श्री जगदेव उकंडराव देशमुख**
**रा. चांदूरबाजार, वार्ड क्रमांक ९**
**पो.ता. चांदूरबाजार, जिल्हा अमरावती-४४४७०४**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती धामणगांव रेल्वे,**
**ता. धामणगांव रेल्वे, जिल्हा अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत वडगांव राजदी, ता.धामणगांव रेल्वे,**
**जिल्हा अमरावती.**

**निर्णय**
**(दिनांक २२.१०.२००८)**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. (मुळ अर्जदार मय्यत झाले असून श्री बाबुराव देशमुख यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे व ते आयोगापूढे सुनावणीस हजर आहेत). जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००६ रोजी सचिव, ग्राम पंचायत वडगांव यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "(१) श्री ओंकार राव शं. हांडे यांचे मालकीची आपण दिलेल्या नमुना ८ नुसार मालमत्ता क्रं.२४७ (४० x ५०) २००० चौ.फुट खुली जागा व कोठा

त्यांचे मालकीची असल्याबाबतची (मालकी हक्काबाबतची) कागदपत्रे/दस्ताऐवजाच्या प्रमाणित प्रती व सदर मालमत्ता ग्राम पंचायत रेकार्डला कोणत्या मालकी हक्कान्वये त्यांचे नांवे करण्यात आली, याबाबत सविस्तर माहिती (२) आपण दिलेल्या दिनांक १.१.२००६ च्या माहिती नुसार नमूना आठ मध्ये मालमत्ता क्रं.२४७ नमूद केला आहे. परंतू दिलेल्या दाखल्यामध्ये मालमत्ता क्रं. २५७ नमूद केला आहे. सदर २४७ व २५७ मालमत्ता एकाच नांवे किंवा दोन वेगवेगळया व्यक्तीच्या नांवे आहे किंवा कसे? याबाबत ग्रा.पं. रेकार्ड नुसार सविस्तर माहिती व दाखला. (३) पूर्व श्री भोजराव हांडे यांचे मकान पश्चिम श्री नानाजी डुकरे यांचे मकान उत्तर श्री नानाजी हांडे यांचे मकान दक्षिण श्री आनंदराव हांडे यांचे मकान या चतु:सिमेतील जागेची नोंद ग्रा.प. रेकार्डला सन १९८१-८२ पूर्वी व तदनंतर कोणाचे नांवाने आहे याबाबत नमुना ८ ची प्रमाणित प्रत. (४) दि.१.१.०६ ला आपण पाठविलेल्या श्री जगदेवराव उ. खोंडे यांचे दि. ६.६.२००१ च्या संमत्ती पत्रानुसार त्यांचे मालकीच जागेची नोंद/फेर फार कोणाचे नांवाने ग्रा.पं. रेकार्डला घेण्यात आला याबाबत तपशिलवार माहिती सह दाखला."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००६ रोजी (२७.२.२००६रोजी) गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णयाप्रमाणे गट विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. मुळ अर्जदर हे मय्यत झालेले असल्यामुळे त्यांच्या तर्फे श्री बाबुराव देशमुख यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ प्रमाणे अर्जदार मय्यत

झाल्यावर व त्यांचे वारस हे दाखल न केल्यास सदरच्या निर्णयाच्या संदर्भात अपील कोणालाही दाखल करता येत नाही. असे असले तरी माहिती उपलब्ध करुन देणे हे महत्वाचे असल्यामुळे सदरचे अपीलाची सुनावणी घेण्यात आली. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, संबंधीत अर्जदाराला दिनांक १७.१.२००६ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु, त्याकरीता त्यांनी कोणत्याही प्रकारचे पत्र दाखल न करता पोस्टाची पावती फक्त दाखल केली आहे. त्यावरुन त्यांच्या अर्जाच्या संदर्भात माहिती पुरविली आहे किंवा नाही याबध्दल निष्कर्ष काढता येत नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे, ती त्यांनी मागितलेली माहिती नाही असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु, अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेलीच माहिती उपलब्ध होईल असे नाही तर सार्वजनिक प्राधिकरणामध्ये ज्या कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल त्याच कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना मय्यत अर्जदाराचा अर्ज दिनांक ७.१.२००६ च्या अर्जाप्रमाणे ग्राम पंचायत वडगांव राजदी कार्यालयात संबंधीत मालमत्ता क्रमांक २४७ च्या संदर्भात जी माहिती मागितलेली आहे व जी उपलब्ध आहे त्याच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विना मुल्या उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्या करीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक : २२.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**अपील क्रमांक २११२/२००७**

**१) श्री अनिल शंकरराव अंबुसकर,**
**मु.नांदूरा, वार्ड क्रं. २, खरेदी विक्री संघामागे**
**ता. नांदूरा, जिल्हा बुलढाणा.**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, संग्रामपूर, जिल्हा बुलढाणा.**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**पंचायत समिती कार्यालय, संग्रामपूर, जि. बुलढाणा.**

**निर्णय**
**(दिनांक २२.१०.२००८)**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२००७ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, पंचायत समिती, संग्रामपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "दिनांक २१.९.२००६ रोजी ग्राम पंचायत सोगोडा ग्राम पंचायत कार्यालय सोगोडा यांना मागितलेल्या माहितीचे अधिकार या अर्जानुसार माहिती अर्जाची मुळ प्रत दिले आहे. (२) दि. २९.११.२००६ चे पत्र उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) बुलढाणा यांचे पत्रानुसार आपण केलेल्या कार्यवाहीचे अहवाला बाबत माहिती.

(३) दि. ३१.१०.०६ चे गट विकास अधिकारी यांना दिलेल्या तक्रार अर्जानुसार केलेल्या चौकशी/कार्यवाही बाबत माहिती द्यावी."

३. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १५.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांच्या दिनांक ८.१.२००७ च्या अर्जाचे संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज हा पंचायत समिती येथे प्राप्त झालेला नाही व कक्ष अधिकारी यांनी तसे लेखी दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी सदरचा अर्ज नोंदणीकृत टपालाद्वारे शासकिय माहिती अधिकारी, पंचायत समिती, संग्रामपूर यांचेकडे पाठविलेला दिसून येते व त्याबध्दलची पोच दिनांक १०.१.२००७ तत्कालीन गट विकास अधिकारी यांनी दिलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांनी अर्ज हा नोदणीकृत टपालाद्वारे पाठविल्यावर सुध्दा सदरच्या अर्जाची नोंद ही संबंधीत पंचायत समितीकडे घेतली गेली नाही असे दिसून येते व त्यामुळे तत्कालीन जे नोंदी घेणारे अधिकारी/कर्मचारी असतील ते दोषी आढळून येतात. त्याकरीता संबंधीत गट विकास अधिकारी यांची ती जबाबदारी होती असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे ते सुध्दा दोषी आढळून येतात. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची दखल घेतलेली दिसून येत नाही व त्यामुळे तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे सुध्दा तक्रार केली होती. व त्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९.११.२००६ रोजी उप

मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.) यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती, संग्रामपूर यांना अर्जाबध्दल व माहिती उपलब्ध करुन देण्याबध्दल आदेश दिले होते तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. व त्यामुळे संबंधीत गट विकास अधिकारी हे पुन्हा दोषी आढळून येतात. मुळात अपीलकर्ता यांनी ज्या जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे माहिती मागितली होती ते नोंदणीकृत टपाल संबंधीत जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी न स्विकारता परत आलेले असल्यामुळेच अपीलकर्ता यांनी सदरच्या अर्जाच्या संदर्भात दिनांक ८.१.२००७ चा अर्ज पाठविलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे जी त्यांना माहिती मागावयाची आहे त्या अर्जाची प्रत ही सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे अद्यापही नसल्यामुळे त्यांनी ती उपलब्ध करुन देवून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. तसेच सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांना त्यांच्या ८.१.२००७ च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुद्येनिहाय विनामुल्या उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्या करता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ८.१.२००७ च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) संबंधीत तत्कालीन गट विकास अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचा अर्ज स्विकारुन सुध्दा त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते अधिनियमाच्या कलम २०(२) प्रमाणे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या

कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावयाची आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक : २२.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**अपील क्रमांक २११४/२००७**

**१) श्री किशोर खिरुसिंग राठोड,**
**रा. काटखेडा, पो. हुडी, ता.पुसद, जि.यवतमाळ**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, यवतमाळ**

**३) जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, पुसद, जि. यवतमाळ.**

**निर्णय**
**(दिनांक २२.१०.२००८)**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.११.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, काटखेडा, पो. हुडी ता. पुसद यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "२००१ ते २००५ पर्यंत आपल्या ग्रा.पं.कोणत्या मार्गाने किती अनुदान (फंड) आला व आपण कुठे कुठे खर्च केला व तो कसा खर्च केला. सर्व माहिती लेखी रेखावहवरची मिळण्यात यावी. जि.प. सदस्यांच्या फंडामधून व पं.स. सदस्य यांच्या फंडामधून दलीत वस्तीवर (फंड) असा किती खर्च झाला, याची सविस्तर माहिती मिळणे."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ४.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलाच्या सुनावणीच्या दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून उप मुख्य कार्यकारी अधिकारी हे हजर आहे. व त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी अपीलीय अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दिनांक १९.१२.२००६ रोजी दाखल केले होते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.२.२००७ रोजी देण्यात आला होता. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे जे द्वितीय अपील दाखल केले आहे त्या मध्ये मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते याबाबत उल्लेख केलेला नाही. त्यातही माहिती अधिका-यांचा तपशिल गट विकास अधिकारी असा दिलेला आहे. मुळ अर्ज मात्र त्यांनी सचिव, ग्राम पंचायत यांचेकडे केलेला आहे. व अशा प्रकारची विसंगती असल्यामुळेच आयोगाकडून नोटीस काढतांना गट विकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ती काढण्यात आलेली आहे. मात्र, मुळ अर्ज हा सचिव, ग्राम पंचायत काटखेडा यांचेकडे केलेला असल्यामुळे व प्रथम अपील मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे केलेले असल्यामुळे सुनावणी मध्ये सचिव, ग्राम पंचायत काटखेडा हे पक्षकार असल्यामुळे आज हजर झालेले दिसून येते. परंतु आयोगाकडील अपीलामध्ये सचिव, ग्राम पंचायत हे पक्षकार नाही. व प्रत्यक्ष अर्जाप्रमाणे गट विकास अधिकारी हे सुध्दा माहिती अधिकारी नाही. व त्यामुळे सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही अधिका-याला जबाबदार धरता येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता

यांना त्यांच्या दिनांक ३.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे सचिव, ग्राम पंचायत काटखेड यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत उपलब्ध असलेल्या माहितीच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक : २२.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**अपील क्रमांक २११९/२००७**

**१) श्री गंगाराम देऊ आतला व इतर**
**मु.उशिरपार (साखराटोला) पो. कारवाफा,**
**ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली.**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी (उ.श्रे.)**
**पंचायत समिती, धानोरा, ता. धानोरा, जि. गडचिरोली.**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
**ग्रामपंचायत कार्यालय साखेरा, पो. कारवाफा,**
**ता. धानोरा, जिल्हा गडचिरोली.**

**निर्णय**
**(दिनांक २३.१०.२००८)**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.६.२००७ (दिनांक २.७.२००७) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००६ (३०.१०.२००६ रोजी ) शासकिय माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, साखेरा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "(१) विषयांत नमूद केलेल्या रोड बांधकामाचे अंदाजपत्रक किती रकमांचे होते आणि त्या प्रमाणे बांधकाम झालेले आहे काय?

(२) हया बांधकामाचा ग्राम सभा उशिरपार सावराटोला ची मंजूरी घेतली होती काय? मंजूरीची प्रमाणित प्रत मिळावी.

(३) ग्रामसभा उशिरपार साखराटोला रोड बांधकाम पुर्ण झाल्याची ग्रामसभा उशिरपारचा काम पुर्ण झाल्याचे प्रमाणित प्रत मिळावी.

(४) २००३ ते २००६ हया कालावधीत उशिरपारचा किती ग्रामसभा झाल्या त्याचे सभाध्यक्ष कोण होते. त्या सभांचा प्रमाणित प्रती मिळाण्यात यावा.

(५) ग्रामसेवक ग्रामपंचायत साखेरा यांनी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ ची सुधारणा २००३ नुसार गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रात ग्रामसभा विशेष अधिकार देण्यात आला असून ग्रामसेवक हे ग्रामसभेचे सचिव या नात्याने ग्रामसभा बोलविण्यास जबाबदार आहेत पण त्यांनी अजून पावेतो ग्रामसभा उशिरपारची सभा कां बोलाविली नाही. याबाबत ग्रामसेवकांनी संविधानिक व्यवस्थेचा भंग केल्याबाबत त्यांना व्यक्तीशः जबाबदार का धरण्यात येऊ नये? तसेच त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यासाठी राज्य माहिति आयोगा मार्फत महाराष्ट्राचा मुख्य सचिवाला का कळविण्यात येऊ नये. याबाबत ग्रामसेवकांनी आपली स्पष्टीकरण द्यावे.

(६) या रोडच्या मंजूर निधीमधून ५ टक्के रक्कम ग्रामनिधीत साखेरा ग्रामपंचायतीच्या मध्ये किती रक्कम आणि कोणत्या वर्षी गुंतवली त्याचे प्रमाणित प्रत मिळावी.

(७) ग्रामसेवक मुख्यालयात राहातात का, राहात नसतील तर मुख्य कार्यपालन अधिकारी मुख्यालयाचा बाहेर राहाण्याबध्दल अनुमती घेतली आहे का, त्याची प्रमाणित प्रत मिळावी.

(८) सन २००० ते सप्टेंबर २००६ पर्यंत साखेरा मुख्यालयी न राहाता सुध्दा ट्रायबल अलौवान्स व घरभाडे आता पर्यंत किती घेतले आहेत, त्याचे एकुण रक्कम बी.डी.ओ. धानोराच्या प्रमाणित प्रतचा सत्य प्रत मिळावी."

३. सदरच्या अर्जाचे अनुषंगोने अपीलकर्ता यांना दिनांक २८.११.२००६ रोजी माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. परंतु, उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे व अपूर्ण माहिती दिलेली असल्यामुळे दिनांक १२.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना विचारले असता अपीलकर्ता यांनी अपूर्ण माहिती मिळाली असे आयोगास सांगितले. व कोणत्या प्रकारची अपूर्ण माहिती मिळाली त्या बाबतही तपशिल सांगितला. त्या तपशिलाप्रमाणे अपीलकर्ता यांना रस्त्याच्या कामांचे संदर्भात मुळ अंदाजपत्रकाची प्रत दिलेली नाही, त्याचप्रमाणे ग्राम सभेच्या ठरावाची प्रत दिलेली

नाही व रस्त्याचे काम पुर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही. सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी त्यांची विनंती आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध आहे व ती पुरविण्यास तयार आहे असे आयोगास सांगितले. परंतु ग्रामसभेच्या ठरावाची माहिती जी जन माहिती अधिकारी देण्यास तयार आहे ती ग्राम पंचायतीच्या ग्राम सभेच्या ठरावाची माहिती आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या सभेच्या ठरावाची माहिती उपलब्ध नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे जी माहिती उपलब्ध आहे त्याच्या प्रमाणित प्रती हया अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २६.१०.२००६ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीप्रमाणे उर्वरित माहिती त्यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांच्या आंत विनामुल्य व्यक्तीश: उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तसेच अपीलकर्ता यांनी मस्टरची मागणी केलेली आहे त्या मस्टरची सुध्दा छायांकित प्रत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक : २३.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**अपील क्रमांक २११८/२००७**

**१) श्री लक्ष्मण वामनराव ठाकरे,**
**जयंत कॅालनी, छत्री तलाव रोड,**
**अमरावती-४४४६०६**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी**
**क्रीडा व युवक सेवा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक,**
**क्रीडा व युवक सेवा संचालनालय, म.रा.,**
**पुणे-१**

**निर्णय**
**(दिनांक २३.१०.२००८)**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी क्रीडा व युवक सेवा संचालनालय हे गैरहजर आहेत. त्यांनी प्रभारी उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, अमरावती यांना प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहाण्यास सांगितल्यामुळे त्या स्वत: उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून कागदपत्रे दाखल झालेली दिसून येते.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००६ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल : "(१) पद बदलवून मिळणेबाबत मी दिनांक ७.७.२००० रोजी दिलेल्या अर्जावर पद बदलवून मिळणेची कार्यवाही झाली किंवा कसे याबाबत माहिति मिळणे. (२) या संचालनालयाच्या अधिकार क्षेत्रा अंतर्गत काही महाविद्यालयात संबंधीत काम सांभाळणा-या करीता पद निर्मीतीस मान्यता देऊन त्या व्यक्तीस त्या पदावर पदोन्नती देण्यात आली किंवा कसे, अशी कार्यवाही करण्यात आली असल्यास पद निर्मितीच्या कार्यवाहीची प्रत मिळणे बाबत."

३. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केले. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर मात्र दिनांक १३.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २९.१२.२००६ च्या अर्जाच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक २२.२.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी, क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांचेकडे मुद्या क्रमांक २ ची माहिती चुकीची उपलब्ध करुन दिली या कारणास्तव प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा विहित मुदतीत दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. व त्यानंतर मात्र दिनांक ४.८.२००७ रोजी शासकिय अपीलीय अधिकारी तथा संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो.

४.	राज्य माहिती आयोगाकडे दाखल झालेल्या द्वितीय अपीलाच्या सुनावणी करीता आज जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितलेली असेल तर त्यांनी स्वतः हजर राहून माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे अधिनियमाच्या कलम १९(५) अन्वये सिध्द करावयाचे असते. व माहिती विहित मुदतीत किंवा योग्य उपलब्ध करुन दिली नसेल तर अधिनियमाचे कलम २० प्रमाणे जन माहिती अधिकारी हे जबाबदार असतात व शास्तीस पात्र असतात व शास्ती लादण्यापूर्वी अधिनियमाच्या कलम २०(१) च्या परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे ऐकूण घेणे आयोगावर बंधनकारक असते. त्यामुळे जन माहिती अधिकारी हे गैरहजर राहील्यास व आयोगास शास्ती लादावयाची असल्यास त्यांचे म्हणणे ऐकुण घेता येत नाही. व आयोगास एकतर्फी निर्णय देणे भाग पडते. या परिस्थितीची जाणिव क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे संचालक व इतर अधिकारी यांना दिसत नाही. मुळातच अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.१२.२००६ च्या अर्जास दिनांक १३.२.२००७ रोजी म्हणजे विहित मुदतीच्या नंतर विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याबाबतचा खुलासा हा जन माहिती अधिकारी यांनी केलेला नाही. तसेच प्रथम अपील सुध्दा ३० दिवसांच्या कालावधीत किंवा विशेष परिस्थिमध्ये ४५ दिवसांच्या आंत त्याबाबतचा निर्णय द्यावयाचा असतो. याबध्दलची जाणिव सुध्दा संचालक तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा दिसून येत नाही. प्रथम अपील दिनांक २२.२.२००७ रोजी दाखल केले असून निर्णय दिनांक ४.८.२००७ रोजी देण्यात आलेला आहे. आज अपीलकर्ता हजर नाही व त्यांनी कोणत्याही प्रकारे लेखी खुलासा दाखल केला नसल्यामुळे व माहिती उपलब्ध झालेली

असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २९.१२.२००६ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक : २३.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर अमरावती विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-**

**अपील क्रमांक २१२६/२००७**

**१) श्री कांताप्रसाद बाबुलालजी मिश्रा,**
**शिक्षक कॅालनी, भक्तीधाम मार्ग,**
**चांदूरबाजार, जिल्हा अमरावती. अपीलकर्ता**

**विरुध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर आयुक्त,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अमरावती.**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा, जि. यवतमाळ. उत्तरवादी.**

**निर्णय**

**(दिनांक २४.१०.२००८)**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातून कागदपत्रे दाखल झालेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.९.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा यांचेकडे दिनांक १.७.१९८६ ते १.७.१९९८ या कालावधीची खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल** : "श्री गुरुदेव आदिवासी प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, चांदापूर, जि. यवतमाळ येथील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नियुक्ती मान्यतेच्या कार्यालयीन प्रती. खालील शिक्षक/कर्मचा-यांचे नियुक्ती मान्यतेच्या प्रती.

| अ.क्रं. | शिक्षक/कर्मचा-यांचे नांव | पद | नियुक्ती दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्री पी.एल. रोहिले | सहाय्यक शिक्षक | ५.८.१९९२ |
| २ | श्री एस.एच. जाधव | " | १.७.१९८७ |
| ३ | श्री बी.पी. कुमरे | " | १.७.१९९२ |
| ४ | श्री यु.एन. देवतळे | " | १.७.१९९४ |
| ५ | कु. पी.डब्ल्यू. कुबडे | " | ७.२.१९९६ |
| ६ | श्री एस.ए. कविटकर | " | १.८.१९९८ |
| ७ | श्री आर.ए. पोहाणे | " | १.७.१९९१ |
| ८ | श्री एस.डब्ल्यू. राऊत | " | १०.२.१९९६ |
| ९ | श्री पी.के. गुल्हाणे | " | १.७.१९९६ |
| १० | श्री पी.ए. उघाडे | " | १.१०.१९९७ |
| ११ | श्री पी.आर. वानखडे | " | १८.७.१९९५ |
| १२ | श्री एम.पी. उईके | स्वयंपाकी | १.११.१९८६ |
| १३ | श्री डी.आर. मेश्राम | " | ४.८.१९८९ |
| १४ | कु.पी.जी. मडावी | " | १.१०.१९९३ |
| १५ | कु.एस.सी.डफळे | " | १.५.१९९६ |
| १६ | श्री आर.एस. आडे | कामाठी | १.७.१९९८ |
| १७ | श्री जी.डब्ल्यू. काळमेध | मदतनीस | १.७.१९९८ |

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये सुनावणी होऊन निर्णय दिला नसून दिनांक २१.१२.२००६ रोजी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. व सदरच्या पत्राची छायांकित प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले दिसून येते.

३. दाखल केलेल्या कागदपत्रावरुन अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाचे निदर्शनास असे आणले की, जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी दिनांक ११.१०.२००६ रोजी जनार्दन बा. बोथे, सरचिटणीस, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज मोझरी आश्रम, ता. तिवसा, जिल्हा अमरावती यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हणून पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या पत्राची प्रतीलीपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे असे दिसून येते. सरचिटणीस, अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ यांनी दिनांक ३०.१०.२००६ रोजी संबंधीत कर्मचा-यांची नियुक्ती आदेश व मान्यतेची प्रत संस्थेच्या या कार्यालयात उपलब्ध नाही, तसेच या प्रती चांदापूर शाळेच्या तत्कालीन मुख्याध्यापक श्री अरुण नामदेवराव डेहनकर (मुख्याध्यापक प्राथमिक शाळा) व श्रीमती वसुंधरा केशवराव गुल्हाणे (मुख्याध्यापिका माध्यमिक शाळा) हयांचेकडे होत्या. त्यांच्याकडून प्रभार स्विकारतांना त्या शाळेला परत मिळाल्या नाहीत. त्या त्यांच्याकडे आहेत याबाबत संस्थेने दिनांक २४.५.२००६ रोजी पोलीस स्टेशन अधिकारी, घाटंजी, जि. यवतमाळ हयांचेकडे तक्रार नोंदविली आहे. साना क्रं.१४/०६ दि. १२.८.०६ रोजी

हे प्रकरण ठाणेदार घाटंजी हयांनी दाखल केलेले आहे. तसेच हया प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासंबंधी मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यवतमाळ हयांच्या सेवेशी दिनांक ११.९.०६ रोजी तक्रार सादर केली असून त्याची प्रत आपल्या माहितीकरीता उपरोक्त संदर्भीय क्रं. २ चे पत्रान्वये आपणास सादर केली आहे, असे प्रकल्प अधिकारी यांना कळविलेले दिसून येते. व सदरच्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते.

४. असे असले तरी, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग कार्यालयाचे प्रतिनिधी यांनी, मागितलेली सदरची माहिती ही म्हणजे मान्यतेच्या प्रती, हया प्रकल्प अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असतात किंवा नाही असे त्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सदरची प्रत प्रकल्प अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असावयास पाहिजे. तसेच अपीलकर्ता यांचे म्हणणे सुध्दा असे आहे की, ते प्रकल्प अधिकारी यांचेकडे सुध्दा गेले होते व त्यांना सदरची माहिती शोधून देण्यास तोंडी नकार दिला. यावरुन सदरची माहिती ही प्रकल्प अधिकारी कार्यालयात सुध्दा उपलब्ध असावयास पाहिजे. व ती संबंधीत जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी विहित मुदतीत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व तशी ती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी हे दोषी आढळून येतात. व अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे शास्तीस पात्र आहे.

५. वास्तविक, आयोगाचे कार्यालयातून सदरच्या अपीलाची सुनावणीची नोटीस दिनांक १८.९.२००८ रोजी निर्गमित करण्यात आलेली आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांना ती नोटीस मिळाली असावयास पाहिजे. असे असले तरी ते आज हजर झाले नाहीत व त्याबाबत त्यांनी खुलासा वगैरे आयोगापूढे सादर केलेला नाही. त्यांना

आयोगापुढे त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली होती परंतु ती त्यांनी गैरहजर असल्यामुळे त्यांनी संधी गमावलेली आहे.

६. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले. मागितलेली माहिती जर अप्पर आयुक्त किंवा प्रकल्प अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असेल तर प्रथम अपीलाच्या सुनावणी मध्ये सुनावणी घेताना याबाबतची माहिती अप्पर आयुक्तांकडून त्यांना उपलब्ध करुन देता आली असती. म्हणजे अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यकता राहीली नसती व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलाचा निर्णय देणे आवश्यक असते. प्रशासकिय पत्र पाठवून माहिती उपलब्ध करुन द्या असे कळविणे हे कागदी घोडे नाचविण्यासारखे आहे. याची दक्षता अप्पर आयुक्त यांनी घेणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे सदरचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ४.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी सदरच्या मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती अपीलकर्ता यांना विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) संबंधीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.९.२००६ च्या अर्जाप्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या पत्राप्रमाणे सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २० (२) प्रमाणे ते दोषी आढळून येतात व त्यामुळे त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची विभागीय चौकशी ही त्यांना लागू असलेल्या सेवा नियमाप्रमाणे करण्यात येवून आयोगाकडे अहवाल ३ महिन्यात सादर करण्यात यावा. सदरची विभागीय चौकशी ही अप्पर आयुक्त, एकात्मिक आदिवासी विकास विभाग, अमरावती यांनी करावयाची आहे.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक : २४.१०.२००८**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,**
**नागपूर अमरावती विभाग, नागपूर.**